18 JAN TO 24 JAN 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:31 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ४ सोमवार दि. १८ जानेवारी २०२१ ते रविवार दि. २४ जानेवारी २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## प्रियकराचे प्रेम अखेर विश्वासघातकी ठरले प्रेयसीलाच ठार मारून त्याने भिंतीत पुरले

वाणगाव/सोनू जाधव

एक काळ असा होता कि प्रेम म्हणजे विश्वास, प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे एकमेकांसाठी प्रसंगी प्राण देण्याची तयारी. प्रेमात फक्त भाव भावनांची तरलता असायची. त्याला वासनेचा कधी स्पर्श सुद्धा होत नव्हता. त्यामुळे प्रेमातील पवित्रता कायम होती आणि या पवित्र तेमुळेच हिर-रांझा, लैला-मजनू, शिरी-फारीहाद यांचे प्रेम जगातील सर्व प्रेमिकांसाठी आदर्श ठरले. पण काळाच्या ओघात हळूहळू प्रेमातील विश्वसनीयता संपुष्ठात येऊ लागली आणि प्रेम हे केवळ शारीरिक आकर्षण आणि त्यातून निर्माण झालेली वासना या पुरतेच मर्यादित राहिले आणि म्हणूनच आजकाल तरूण-तरुणी प्रेमाच्या नावाखाली एकत्र येतात आणि लैंगिक सुखाचा मनमुराद आनंद लुटून मोकळे होतात. प्रियकराकडून प्रेयसीला भलेही लग्नाचे वचन मिळालेले असले तरी ज्या गोष्टी लग्नानानंतर मिळणार होत्या. त्या अगोदरच मिळाल्याने प्रियकर कशाला तिच्याशी लग्न करील.



आरोपी सुरज

उमरोळी येथे राहणाऱ्या तरुणीच्या बाबतीत असेच घडले. लग्न करील या भरोश्यावर ती प्रियकरासोबत पळून गेली. पण मौजमजा करून झाल्यावर प्रेयसीने जेंव्हा प्रियकराच्या मागे लग्नाचा तगादा लावला तेंव्हा निर्दयी प्रियकराने तिचा खून करून तो राहत असलेल्या घराच्या भिंतीत तिचा मृतदेह पुरून टाकला आणि ती जिवंत आहे हे दाखवण्यासाठी तिच्या सोशल मिडियावरील अकाऊंटवरून चॅटिंग करू लागला. पण मुलीच्या पालकांना संशय आल्याने या शातीर दिमाग प्रियकराच्या पापाचा घडा भरला आणि तो पोलिसांच्या जाळ्यात सापडला. एखाद्या हिंदी सिनेमात शोभेल अशा या क्राईम कथेची नायिका होती उमरोली येथे राहणारी दुर्दैवी अमिता मोहिते. अमिताचे सुरज घरत नावाच्या तरुणाशी प्रेम होते. मात्र या प्रेमाला घरच्यांचा विरोध असल्याने अमितने सुरज बरोबर पळून जाऊन लग्न करण्याचा ...पान ६ वर



## डहाणूमध्ये लुटारू उद्दाम झाले दरोडा घालून सीएला ठार केले

पालघर/क्राईम रिपोर्टर

पालघर जिल्ह्याच्या शहरी भागात आजकाल गुन्हेगारीला उत आला असून चोरी, लुटमार, दरोडे आणि खंडणीच्या घटना वाढल्या आहेत. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांच्याही हत्या घडत असल्याने एकाकी राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. डहाणू शहरात ज्येष्ठ नागरिक असलेलेया सीएची हत्या झाल्याने मोठी खळबळ माजली आहे. या प्रकरणी डहाणू पोलीस अज्ञात मारेकऱ्याचा शोध घेत आहत.

डहाणू शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या जुन्या देना बँकेजवळ जयप्रकाश पोंदा हे सीए राहत होते.१५ जानेवारीला सकाळी जेंव्हा त्यांची मोलकरीण कामाला आली तेंव्हा तिला मोठा धक्का बसला. कारण घरात पोंदा साहेब मरून पडले होते. तसेच घरातील समान अस्ताव्यस्त पडले होते. तसेच मृतदेहाजवळ रक्त पडलेले होते. मोलकरणीने तत्काळ या घटनेची माहिती शेजाऱ्यांना देताच त्यांनी पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवून दिला. घरातील अस्ताव्यस्त पडलेले समान पाहता फोंडा यांच्या घरात दरोडा पडला असावा आणि दरोडेखोरानीच त्यांची हत्या केली असावी असा पोलिसांना संशय असून पोलीस अज्ञात मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत. पोंदा हे त्यांच्या घरात एकटेच राहायचे असे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, जयप्रकाश पोंदा असं हत्या झालेल्या सीएचं नाव आहे. राहत्या घरी दरोडेखोरांनी त्यांची हत्या केली. शुक्रवारी, १५ जानेवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारास हा प्रकार समोर आला. डहाणू रोड रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला शहरातील मुख्य रस्त्यावर जुन्या देना बँकेच्यासमोर त्यांचे घर असून तिथे ते एकटेच राहत होते. याचाच फायदा घेत दरोडेखोरांनी डाव साधला. दरोडेखोरांनी त्यांच्या घरात चोरीच्या उद्देशाने प्रवेश करून, ही हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज डहाणू पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोंदा यांच्या घरी काम करण्यासाठी चार ...पान ६ वर

## ५० हजारांची खंडणी नाही दिली भिवंडीत महिलेवर फायरिंग केली





भिवंडी/अभिजित हिरे

परप्रांतातून आलेल्या गुन्हेगारांनी भिवंडी शहराला अक्षरशः क्राईम कॅपिटल बनवले आहे. बाहेरच्या राज्यातून भिवंडीत येणारे काही नामचीन गुंड भिवंडीत खून, दरोडे, अपहरण, बलात्कार यासारख्या गंभीर गुन्ह्यात भाग घेऊन शहरात दहशत माजवीत आहेत. मध्य प्रदेशातून भिवंडीत आलेल्या दोन दाखलेबाज गुंडांनी एका ट्रान्सपोर्टवाल्याच्या पत्नीला ५० हजारांसाठी ब्लॅकमेल करायला सुरवात केली होती. मात्र तिने पैसे देण्यास नकार देताच त्यातल्या एकाने तिच्यावर गोळीबार करून तिला जखमी केले. सध्या तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असून दोन्ही गुंडांना अटक केली आहे.

एका महिलेच्या घरात घुसून तिच्यावर गोळीबार झाल्याची घटना १२ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास घडली होती. हि काल्हेर घटना भिवंडी तालुक्यात काल्हेर गावातील जय दुर्गा सोसायटीमध्ये घडली होती. विशेष म्हणजे भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाकडे कुठलाही सुगावा ...पान ६ वर

## ड्रायव्हरशी पंगा मॅनेजरच्या प्राणावर बेतला अपमानाचा बदला त्याने खून करून घेतला

अकोला/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही माणसाचा अपमान झाला कि त्या अपमानाचा बदल घेण्यासाठी तो धडपडत असतो. कारण त्याच्या उरात जी बदल्याची आग भडकलेली असते त्या आगीत तो जळत असतो. त्यामुळे अपमान करणाऱ्याचा जोवर तो सूड घेत नाही, तोवर स्वस्थ बसत नाही. एका खदाणीच्या खडी मशिनवरील मालाची वाहतूक करणाऱ्या ड्रायव्हरचा अवघ्या ७५ रुपयांसाठी तिथल्या म्यॅनेजरने अपमान केला होता आणि त्याला कामावरून काढून टाकले होते. मात्र या अपमानाच्या आगीत जळत असलेल्या त्या ड्रायव्हरने आपल्या साथीदारांच्या मदतीने म्यॅनेजरला ठार मारून बदला घेतला. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.





मयत अग्रवाल

अकोला शहराला लागून असलेल्या बोरगाव मंजू मलकापूर परिसरात गिट्टीच्या खदानी मोठ्या प्रमाणात आहेत. या खाणीतून जिल्ह्यासह परिसरात खडीचा पुरवठा मोठ्या प्रमाणात केला जातो. या परिसरात संजय स्टोन क्रशर नावाची गिट्टी खदान आहे. या खदानीवर गोपाल अग्रवाल हे मॅनेजर पदावर कामाला होते. खाणीवरील खडीचे मागणीप्रमाणे उत्पादन, पुरवठा, खडीच्या पैशांचा हिशेब आणि मजुरांचे पगार असे सर्व काम संजय अग्रवाल बघत होते. गोपाल अग्रवाल हे अपमानास्पद वागत असल्याची मजुरांची नेहमी तक्रार रहात होती. या गिट्टी खदानीवर सागर कोठाळे नावाचा वाहन चालक होता. ...पान २ वर

## संशयाने प्रेमाचा घात केला निष्पाप प्रेयसीचा जीव गेला

नाशिक/क्राईम रिपोर्टर

प्रेम किंवा मैत्री हि विश्वासाच्या पायावर उभी असते. त्यामुळे मैत्रीत कुणी विश्वासघात करू नये. पण त्याच बरोबर प्रेमात प्रियकराने प्रेयसीवर किंवा प्रेयसीने प्रियकरावर संशय घेऊ नये. कारण संशयातून गैरसमज निर्माण होतात आणि त्यातून झालेले वाद कधी कधी माणसाच्या जीवावर उठतात. अर्चना आणि तन्मय या प्रेमी युगुलाच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. मनमोकळ्या स्वभावाची अर्चना कॉलेजातील मित्रांसोबत बोलते म्हणून तिच्या प्रियकराने तिच्यावर संशय घेतला आणि याच संशयातून हॉटेलच्या रूमवर दोघांच भांडण झालं आणि रागाच्या भरात तन्मयने अर्चनाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी तन्मयला अटक केली आहे.



मयत अर्चना



अर्चना व तन्मय दोघेही शालेय जिवनापासून एकमेकांवर प्रेम करत होते. दोघेही सोबतच शिक्षण घेत होते. अर्चना ठाणे येथील तर तन्मय पालघर येथील रहिवासी होता. शालेय शिक्षण पुर्ण झाल्यानंतर दोघांनी नाशिक येथे नर्सिंगच्या शिक्षणासाठी प्रवेश मिळवला. दोघे नर्सिंगच्या तिसऱ्या वर्षाला शिकत होते. बालपणापासून एकमेकांवर प्रेम करणारे प्रेमी महाविद्यालयात देखील सोबतच शिक्षण घेत होते. अर्चना सुरेश भोईर ही ठाणे जिल्ह्यातील बोईसर येथील तर तन्मय प्रविण धनवा हा कोळीवाडा पालघर येथील रहिवासी होता. ...पान २ वर

## धंद्यात त्याने दिला नाही ठरलेला वाटा भावानेच काढला मावस भावाचा काटा



मयत मुनीर

मिरज/क्राईम रिपोर्टर

धंद्यात नेहमीच फायदा तोटा पहिला जातो. अशावेळी कोण नात्यागोत्याचा विचार करीत नाही आणि नात्यातल्या एखाद्याने जरी मदत मदत केलेली असली तरी काही लोकांना त्याचा विसर पडतो आणि मग ते मदत करणाऱ्याच्याच जीवावर उठतात. मुनीर आणि राजू या दोन मावस भावांच्या बाबतीत असेच झाले. गावाबाहेर काढलेल्या मुनिरला दुसऱ्या गावात राहणाऱ्या त्याच्या मावस भावाने सहारा दिला. त्याला रेतीच्या धंद्यात घुसवले. मात्र त्यातून त्याने काही पैसे आपल्याला द्यावेत असे अगोदरच त्याच्याकडून वदवून घेतले आणि राजू हा आपला उपकारकर्ता असल्याने मुनीरणे सुद्धा ते मान्य केल. पण नंतर मात्र त्याने पलटी खाल्ली. त्यामुळे चिडलेल्या राजूने त्याचा कायमचा काटा काढला. याप्रकरणी मिरज पोलिसांनी राजूला अटक केली आहे.



आरोपी रियाज

मिरज शहरात ११ जानेवारी २०२१ रोजी रात्री ८ वाजणेच्या सुमारास दोघा मावस भावात सनशाईन बारमध्ये वाद होऊन मुनीर मुसा शेख या तरूणावर त्याचाच मावस भाऊ राजू उर्फ रियाज गौस याने चाकूने १४ वार करून त्याचा निर्घृण खून केला.बार व्यस्थापकाने या घटनेची माहिती महात्मा गांधी पोलीस ठाण्याला दिली. मुनीर मुसा शेख हा मुळचा मांगले ता.शिराळा जिल्हा सांगली येथे राहणारा होता. तो गावात कोणत्याही प्रकारचा कामधंदा करीत नव्हता. वयाची ३५ शी ओलांडली तरी तो गावात उडान टप्पू म्हणून फिरत होता. त्यातच त्याने गेल्या दोन तीन वर्षापूर्वी मांगले गावात काही तरी गैरकृत्य केले होते. यातून मोठा वांदग निर्माण झाला होता. त्यावेळी सगळ्या गावकऱ्यांनी मिळून मुनीर शेख याला गावातून ...पान २ वर

## दारूची पार्सल महागात पडली बारच्या समोरच हत्या घडली



औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

आजकाल तरुण मुलांना शुल्लक गोष्टीवरूनही राग येतो आणि रागाच्या भरात ते सरळ हाणामारीवर येतात. परिणामी सध्या गोष्टीवरून झालेल्या वादातूनही एखाद्याचा जीव जातो. कारण सळसळत्या तरूण रक्ताला रोखणे दिवसेंदिवस कठीण बनत चालले आहे. औरंगाबादमध्ये दारूचे पार्सल घ्यायला गेलेल्या एका तरुणाचा बारच्या बाहेर उभ्या असलेल्या तरुणांशी शुल्लक कारणावरून वाद झाला आणि त्या वादात त्याला जीव गमवावा लागला.

बिअर शॉपीमधून बाहेर पडल्यानंतर झालेल्या किरकोळ वादातून एका २७ वर्षीय तरुणाची धारदार चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना औरंगाबाद शहरातील सिटी चौक परिसरात घडली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समीर खान सिकंदर खान या (२७ वर्षीय) असं मृत तरुणाचे नाव आहे. धारधार चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. या हत्येप्रकरणी सिटीचौक पोलिसांनी ३ संशयितांना ताब्यात घेतले आहे. त्या मधील दोन आरोपी हे अल्पवयीन आहेत. समीर आणि त्याचा मित्र आदिल हे दोघे जण शहरातील मध्यवर्ती भागातील पिया मार्केट येथील ओम साईलीला बिअर बारमधून पार्सल आणण्यासाठी गेला होता. पार्सल घेऊन येत असताना ...पान ६ वर

## सातार्‍यात ज्येष्ठ अभिनेत्रीचा खून झाला भाडेकरू कि नातेवायीकांनी गेम केला?

सातारा/क्राईम रिपोर्टर

एकाकी राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून याबाबत पोलीसही चिंतेत आहेत. जेष्ठ नागरिकांच्या हत्या प्रामुख्याने त्यांच्या घरात काम करणारे नोकर किंवा संपत्तीच्या वादातून त्यांचे नातेवाईकाच करतात असे आजवर दिसून आले आहे. साताऱ्यात अशाच प्रकारे एक हत्येची घटना घडली आहे. एकटी राहणारी एक महिला शनिवारी सकाळी तिच्या बंगल्यात मृतावस्थेत सापडली. कुणी तरी तिची निर्घुण हत्या केली होती. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सातारा नजीकच्या कृष्ण नगर येथील गजानन हौसिंग सोसायटीतील एका बंगल्यात जया गायकवाड नावाची एक ६५ वर्षांची वृद्ध महिला एकटीच राहत असे. तिच्या मुलीचे लग्न झाल्याने ती सासरी गेली, तर मुलगा शैलेन्द्र हा सुद्धा दुसरीकडेच राहतो. मात्र काल सकाळी जया गायकवाड या त्यांच्या बंगल्यात मृतावस्थेत आढळल्या कुणी तरी त्यांची हत्या केली होती. या घटनेची माहिती समजताच सातारा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवून दिला. ज्या गायकवाड या अभिनेत्री असल्याने ...पान ६ वर

## दारूवरून अंगात हैवान शिरला जिवलग मित्राचा त्याने गळा चिरला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



दारुड्या माणसाला दारू मिळाली नाही कि तो एकदम वेडापिसा होतो. अशावेळी त्याला एकतर दारू हवी असते किंवा दारू पिण्यासाठी पैसे हवे असतात. मात्र ते जर त्याला मिळाले नाही, तर मग तो नाती-गोती, दोस्ती-यारी कसलाच विचार करीत नाही. ज्याने दारू किंवा दारूसाठी पैसे दिलेले नसतात त्याच्यावर तो इतका वैतागलेला असतो कि रागाच्या भरात त्याचा खून करायलाही मागेपुढे पाहत नाही. इचलकरंजीत अशाच एका घटनेत मित्राने उधारीवर दारू दिली नाही म्हणून चिडलेल्या दारुड्याने आपल्या मित्राचा गळा चिरून खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मागील वर्षी म्हणजे २९ ऑक्टोबंर २०२० रोजी तो गोठयात झोपला असताना त्याचा खून झाला होता. त्याचा गळा कुणीतरी अज्ञात इसमाने धारदार हत्याराने चिरला होता.ही घटना ज्यावेळी मालक संजय लायकर यांना समजली त्यावेळी त्यांनी त्याला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले होते. पण दवाखान्यात उपचार सुरू असताना उत्तम चौगले याचा ७ नोव्हेंबर २०२० रोजी मृत्यू झाला होता. या घटनेची नोंद शिवाजीनगर पोलीस स्टेशनला झाली होती. या घटनेचा तपास शिवाजीनगर पोलीसांच्या बरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणेचे पथक ही करत होते. नुकतेच या घटनेतील संशयीत आरोपीला पकडण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पथकाला ...पान २ वर

CMYK

पान १ वरून....

## ड्रायव्हरशी पंगा मॅनेजरच्या प्राणावर...

सागर कोठाळे याने दोन महिन्यापुर्वी आणलेल्या खडीच्या हिशेबात ७५ रुपये कमी दिले होते. ते ७५ रुपये वाहन चालक सागर कोठाळे याच्याकडून खर्च झाले होते. त्यावरुन मॅनेजर गोपाल अग्रवाल आणि वाहन चालक सागर कोठाळे यांच्यात वाद झाला होता. या वादात मॅनेजर असलेल्या गोपाल अग्रवाल यांनी सागर यास शिवीगाळ केली व कामावरुन काढून देखील टाकले होते.

कामावरुन काढून टाकल्याचा राग सागरच्या मनात होता. परंतू त्यापेक्षा जास्त राग त्याला अग्रवाल यांनी अपशब्द बोलल्याचा आला होता. ते अपशब्द सागरच्या जिव्हारी लागले होते. कामावरुन काढून टाकणे हा कामाचा भाग होता. मात्र अपशब्द बोलणे हे सागरच्या मनाला रुचले नव्हते. त्यामुळे संधी साधून मॅनेजर गोपाल अग्रवाल यांना चांगलाच धडा शिकवण्याचे त्याने मनाशी ठरवले होते. व्यवस्थापक गोपाल अग्रवाल यांचे ते शब्द कायम सागरच्या मनात भिनत होते आणि कानात घुमत होते. त्यामुळे त्याच्या मनातील खदखद काही केल्या थांबत नव्हती. आता गोपाल अग्रवाल यास कायमचे संपवण्याचा सागरने मनाशी विचार पक्का केला होता. त्यासाठी तो योग्य वेळेची वाट बघत होता. जेमतेम परिस्थिती असलेल्या सागर कोठाळे याने गोपाल अग्रवाल यास मारण्यासाठी देशी कट्टा विकत घेण्याचा विचार केला व तो विचार अमलात देखील आणला. देशी कट्टा विकत घेण्यासाठी त्याने आपली दुचाकी मध्यस्तामार्फत केवळ तिन हजार रुपयात विकली. त्याच मध्यस्तामार्फत त्याने मध्यप्रदेशातून देशी कट्टा विकत घेतला. हाती आलेल्या देशी कट्ट्याची त्याने आधी ट्रायल घेवून पाहिली. एक राऊंड हवेत फायर करुन पाहिल्यानंतर तो कट्टा काम करत असल्याची सागरची खात्री झाली. त्यानंतरच त्याने तो विकत घेतला. काही दिवसांनी सागर यास पुन्हा त्या खदानीवर तात्पुरते काम मिळाले. काम मिळाले असले तरी सागरच्या मनात गोपाल अग्रवालबद्दल राग कायम होता. तो गोपाल अग्रवाल याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून होता. खदान व्यवस्थापक गोपाल अग्रवाल हा बोरगाव मंजू येथुन दररोज अकोला जाण्यासाठी निघत होता. याची माहिती सागरने माहिती करुन घेतली होती. गोपाल अग्रवाल याचा गेम करण्यासाठी त्याने त्याचे अजून तिन मित्र तयार केले होते. गोपाल अग्रवाल याचा वाढदिवस २६ डिसेंबर रोजी होता. त्याच रात्री त्याचा कायमचा गेम करायचा हे सागरने ठरवले. बोरगाव मंजू येथील एका खदानीत गोपालचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सागर व त्याचा एक साथीदार असे दोघे जण हजर होते. वाढदिवसाच्या कार्यक्रमात गर्दी असल्यामुळे गोपाल यास मारल्यानंतर पकडले गेल्यास काम अवघड होईल अशी भिती सागरला वाटू लागली. त्यामुळे त्याने तो विचार बदलला.

सायंकाळी सहा वाजेपासून सागर कोठाळे, त्याचा मित्र विजय अंबादास राठोड (रा. कातखेड), लखन वसंता राठोड (रा. कुंभारी), रणधीर भारत मोरे (रा. राहुल नगर शिवनी) हे चौघे राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल महाकाली भागात फिरत राहिले. सर्व जण गोपालच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. अकोला गावाच्या दिशेने जातांना वाटेत एका हॉटेलवर गोपाल अग्रवाल यांचा मद्यप्राशनाचा कार्यक्रम होतो हे सागर यास माहिती होते. सागरसह चौघे जण गोपालच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवून होते. रात्री नऊ वाजता दुचाकीवर निघालेल्या गोपाल अग्रवाल यांचा पाठलाग करण्यात आला. सागरने काही अंतर पार केल्यानंतर गोपाल अग्रवाल यास गाठले. अगदी जवळून त्याने गोपालच्या मानेवर गोळी झाडली. कट्ट्यातून सुटलेली गोळी बसताच हा घातपाताचा प्रकार असल्याचे गोपालच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. लागलीच सागरने दुसरा फायर केला. मात्र यावेळी नेम चुकला होता. कट्ट्यातील गोळ्या संपल्या असल्या होत्या मात्र पहिल्याच गोळीत गोपाल जमीनीवर कोसळला होता. तडफडणाऱ्या गोपालच्या डोक्यावर सागरने वजनदार कट्ट्याचा वार केला. काही क्षणातच गोपाल अग्रवालचा मृत्यू झाला. गोपाल अग्रवाल यांच्याजवळ असलेल्या बॅगेत दिड लाख रुपये होते. ती बॅग घेवून सर्व जण पसार झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. वानखेडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शैलेश सपकाळ, पोलीस अधीक्षकांच्या स्कॉडमधील पोलीस निरीक्षक विलास पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन शेळके, खदान ठाण्याचे पोलीस निरीक्षक खंडेराव यांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. काही दिवसांपुर्वी मयत गोपाल अग्रवाल व सागर कोठाळे यांच्यात वाद झाला असल्याची माहिती पोलिस पथकाला समजली. सागर कोठाळे याला अलगद पकडण्यासाठी त्याच्या आई आणि प्रेयसी अशा दोघींना चौकशीकामी पोलिस पथकाने ताब्यात घेतले. आपली आई आणि प्रेयसी यांना ताब्यात घेतल्याचे समजताच समजताच सागर पोलिसांना शरण आला. त्यानंतर त्याच्या आई व प्रेयसीला सोडून देण्यात आले. सागरला अटक केल्यानंतर त्याच्या इतर मित्रांची नावे चौकशीत पुढे आली. त्यांना देखील अटक करण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस स्टेशनला गु.र.न.४२७/२० भा.द.वि. ३९४, ३०२ व ३२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरु आहे.

## संशयाने प्रेमाचा घात केला...

मोकळ्या मनाची अर्चना महाविद्यालयात इतर मुलामुलींसोबत बोलत असे. त्यामुळे तन्मय आता तिच्या चारित्र्यावर संशय घेवू लागला. वास्तविक बालवयापासून दोघे एकमेकांवर प्रेम करत होते. त्यामुळे तन्मयला तिच्यावर संशय घेण्याचे काही कारणच नव्हते. मात्र संशयाचे भुत एकदा चढले की लवकर उतरत नाही असे म्हणतात. संशयाला काही औषध देखील नसते. तन्मयच्या बाबतीत देखील तसेच झाले. त्याचा अर्चनावर संशय बळावू लागला. दोघेही आपले गाव सोडून नाशिक येथे रहात होते. बुधवारी १३ जानेवारी रोजी दुपारी तिन वाजता तन्मयने अर्चनाला सीबीएस नजीक असलेल्या हॉटेल सिटी पॅलेसमधे आणले. या ठिकाणी त्याने रुम बुक केली. दोघांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत हॉटेलच्या रुम बुकींगसाठी दिली. दोघेही सज्ञान असल्यामुळे त्यांना हॉटेलची रुम मिळण्यात अडचण आली नाही. हॉटेलच्या रुममधील एकांत मिळाल्यामुळे आता तन्मयच्या मनातील संशय दुर होईल व साधकबाधक चर्चा होईल असे अर्चनाला वाटले होते. मात्र झाले वेगळेच. तन्मयने पुन्हा आपल्या मनातील संशयाचा धागा बाहेर काढला. पुन्हा दोघात कडाक्याचे भांडण सुरु झाले. त्यावेळी रात्रीचे बारा वाजून गेले होते. यावेळी अर्चना जोरजोरात ओरडू लागली. एवढ्या रात्री तीचे ओरडणे सुरु झाल्यामुळे तिचा आवाज बंद करण्यासाठी तन्मयने तिचे तोडं उशीने दाबले. तरीदेखील तिचे ओरडणे काही केल्या बंद होत नव्हते. त्यामुळे तन्मयने तिचे तोंड उशीने दाबून धरले. त्यात तिचा मृत्यू झाला. काही वेळाने तिची हालचाल कायमची बंद झाली. ती मरण पावल्याचे दिसताच तन्मय हादरला. आता काय करावे हे त्याला सुचत नव्हते. तो रात्रभर व सकाळपर्यंत तिच्या मृतदेहाजवळ तसाच बसून राहीला. दुसऱ्या दिवशी त्यांना रुम सोडायची होती. मात्र ती मृत झाल्यामुळे सुन्न झालेला तन्मय तसाच रुममधे बसून राहीला. अखेर त्याचा धिर सुटला. त्याने तिच्या नातेवाईकांना फोन करुन घडलेल्या घटनेचा वृतांत कथन केला. तिचे आई वडील तिला घटनेच्या आदल्या दिवसापासून फोन लावत होते. मात्र तिचा फोन लागत नव्हता. त्यामुळे ते देखील हैरान झाले होते. दरम्यान तन्मय याचाच फोन त्यांना आला. तन्मयने घडलेला प्रकार कथन करुन मला वाचवा अशी विनवणी केली. आपल्या मुलीचा मृत्यू झाल्याची माहीती मिळताच तिचे वडील व काही नातेवाईक नाशिकला धडकले. आल्या आल्या त्यांनी हॉटेलच्या त्या रुममधे धाव घेतली. त्यांची धावपळ बघून हॉटेलचे कर्मचारी देखील त्यांच्या मागेमागे आले. सर्वांनी आत प्रवेश केल्यावर खरा प्रकार सर्वांना समजला.

लागलीच या घटनेची माहीती हॉटेल प्रशासनाने सरकारवाडा पोलिसांना कळवला. माहिती मिळताच उपआयुक्त अमोल तांबे, संग्रामसिंह निशाणदार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत सोमवंशी यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी वर्गाने घटनास्थळी धाव घेतली. मयत अर्चनाच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सरकारवाडा पोलिसात अर्चनाच्या मृत्यू प्रकरणी तन्मय विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. मुलीचा मृतदेह बघून अर्चनाच्या वडीलांसह नातेवाईकांनी तन्मयला मारण्यास धाव घेतली मात्र पोलिसांच्या हस्तक्षेपाने त्याचा बचाव झाला. संशयित तन्मय हा अर्चनावर शालेय जिवनापासून प्रेम करत होता. दोघेही सोबतच शिक्षण घेत होते. अर्चना इतर मुला-मुलींसोबत बोलत असल्यामुळे तन्मय तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यातून झालेल्या वादातून त्याने खून केल्याची माहिती पुढे आली. खून केल्यानंतर तो उदासपणे तिच्या मृतदेहाजवळ बसून होता. सायंकाळी त्याने त्याच्या नातेवाइकांना माझ्या हातून मोठी चूक झाल्याचे सांगत मदतीचे आवाहन केले. या प्रकरणी सरकारवाडा पोलिस तपास करत आहेत.

## दारूवरून अंगात हैवान शिरला...

यश आले.आणि उत्तम चौगले यांच्या खूनाचा छडा तब्बल दोन महिन्यांनी लावला. अट्टल पिंडक्याला दारू ही फुकटच पाहिजे असते. त्यामुळे ते कुणी फुकटची दारू पाजतात का याच्या शोधात असतात,आणि त्यातूनच, कमेकांची गरज ओळखून पिंडक्याला पिंडक्याची ओळख ही लगेच लागत असते.इचलकरंजी शहरात गावठी दारू चोरून मोठया प्रमाणात विकली जाते आणि अशी ठिकाणे ही पिणाऱ्या व्यक्तींना माहित असतेच. शहरातील लाखे नगर, आवळे गल्ली, त्याचप्रमाणे गोंधळी गल्ली, नदीवेस नाका परिसरातील चोरटया ठिकाणी गावठी दारू कॅनने विकली जाते. त्याचबरोबर ही गावठी दारू मळयातून चोरून विकणारे ही बरेच आहेत. साजणी, तिळवणीच्या माळावर गावठी दारूचे अड्डे आहेत. तेथून आणि इचलकरंजी शहरातील ओढयावरील गावठी दारुच्या अड्डयावरील दारू कॅनमध्ये नेऊन सर्रास विकली जाते.त्यामुळे तळीरामाची ये-जा ही अशा ठिकाणी कधी चोरून तर कधी उघडपणे चालू असते. इचलकरंची शहरातील लिंबू चौक येथे राहणारा नजीर रशिद मुल्लांनी हा देखील अट्टल पिंडका होता. त्याला दारू नाही मिळाली तर तो अस्वस्थ होत असायचा.त्याची आणि उत्तम चौगले याची दारू पिण्यातूनच खास ओळख झालेली होती. तो नेहमी उत्तम काम करीत असलेल्या लायकर मळयातील जनावरांच्या गोठयात येत जात होता.तेथे ते दोघे दारू पित बसत होते.नजीर मुल्लाणी हा लायकर मळ्यामध्ये ही काही वर्ष राहयला होता. तो यंत्रमागावर कामगार म्हणून काम करीत होता.तो दारू पिण्यासाठी उत्तम चौगले याच्याकडे येत होता. ही गोष्ट मालक संजय लायकर यांना माहित नव्हती.तो त्याचा विश्वासू गडी होता. त्याचे काम प्रामाणिकपणे चालू असायचे. त्यामुळे संजय लायकर हे कामा शिवाय त्याच्याकडे इतर कोणत्याही गोष्टीची चौकशी करीत नव्हते. तसे त्याना सवड ही नव्हती. कारण त्याचा मागाचा कारखाना ही होता. तिकडे ही ते लक्ष देत होते.मळयाकडे ते दिवसातून एक दोन वेळा आणि रात्रीचे वेळी एकदा येत होते.

उत्तम चौगले याला दारू ही सकाळ संध्याकाळ लागत होती.तो कायमच दारूच्या नशेत राहत होता.त्यामुळे तो गावाकडची आपली शेती बघायची सोडून इचलकरंजीत लायकर याच्या मळ्यात राहत होता.त्याच्या दारू पिण्याच्या सवयीमुळे त्याचे घरचे लोक ही वैतागलेले होते.ते त्याची चौकशी ही करत नव्हते.तो चार पाच दिवसातून एकदाच घरी जात येत होता.लायकर मळयात दारू प्यायला मिळते हे बऱ्याच अट्टल पिंडक्याना माहित असल्याने त्यांनी ही उत्तमशी मैत्री वाढविली होती. तो ही तेथे त्याना पैसे घेऊन दारू प्यायला देत होता.लायकर यांच्या गोठयाची आणि जनावरांची निगा राखण्याचे काम करत असताना तो दारू विकत आहे.किंवा त्याच्याकडे दारू मिळते हे बऱ्याच लोकांना माहित होते.तसे ते नजीर मुल्लांणी याला देखील माहित होते. घटनेच्या दिवशी म्हणजे २९ ऑक्टोबर २०२०ला सकाळी ११ वाजणेच्या सुमारास नजीर हा लायकर मळ्यात गेला होता. तेथे गोठयात काम करत असलेल्या उत्तमला गाठून त्याने मला प्यायला दारू पाहिजे म्हणून सांगितले.त्यावेळी उत्तम याने त्याला मी अजून दारू आणलेला नाही.आणि दारू ही शिल्लक नाही असे तो म्हणाला,त्यावर नजीर हा नाराज होऊन तेथून निघून गेला.दुपारच्यावेळी परत तो त्याच्याकडे दारूसाठी आला होता.सकाळी वाईन शॉपीमधून अथवा जवळच्या बारमधून उत्तम हा कॅन क्वॉटर घेऊन येतो हे नजीरला माहित होते. म्हणून तो दुपारच्यावेळी त्याच्याकडे परत दारू मागण्यासाठी आला होता. त्यावेळी ही उत्तम याने त्याला दारू देण्यास नकार दिला.कारण तो दारूचे पैसे देत नव्हता.त्याला फुकटची आणि उधारीवर दारू प्यायला पाहिजे होती. या अगोदरच दारूचे पैसे तो अजून उत्तमला देणार होता.म्हणून तो दारू मागत असताना उत्तमने त्याच्याकडे लक्ष दिले नव्हते. दारूच्या उधारीची बाकी जास्त होती.तो ते पैसे देत नव्हता.म्हणून उत्तमने त्याला उधार दारू देण्यास नकार दिला.याचा राग नजीर याला आलेला होता. उत्तम हा मित्र असूनही उधार दारू देत नाही त्याच्या गोठयातएका पिशवीत क्वॉटरच्या बाटल्या दिसत होत्या. नजीरचा गळा त्यातील क्वॉटर बघून कोरडा पडला होता. दारू पिण्यासाठी त्याचा कासावीस होत होता.त्याला दारूची तल्लफ ही झाली होती. तर उत्तमने ही नेहमीसारखी आपल्या घशाखाली थोडी दारू रिचवली होती.त्यावेळी लॉकहाऊन असल्याने सहजा कुठे ही दारू मिळत नव्हती. त्यामुळे चोरून दारू विकणाऱ्याचे चांगलेच फावले होते.

नजीर याने त्याला दारू दे ,मी तुला दोन दिवसात पैसे देतो असे सांगितले.परंतु उत्तम हा काही ऐकत नव्हता.त्यामुळे त्या दोघांत वाद झाला होता. हाच राग मनात धरून नजीर हा तेथून त्यावेळी गेला.त्यानंतर रात्रीच्या वेळी झोपलेल्या अवस्थेत गोठयात उत्तम चौगुले हा गळा चिरलेल्या अवस्थेत मिळून आला. त्याचा गळा कोणत्या तरी कटरने चिरलेला होता. ही गोष्ट ज्यावेळी मालक संजय लायकर यांना समजली त्यावेळी त्यांनी या घटनेची माहिती शिवाजीनगर पोलीस स्टेशनला देवून उत्तम चौगले याला शहरातील आयजीएम हॉस्पिटल येथे दाखल केले होते. परंतू त्याची परिस्थिती नाजूक असल्याने तेथील डॉक्टरांनी त्याला सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे घेऊन जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे लायकर यांनी त्याला पुढील उपचारासाठी सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. शिवाजीनगर पोलीसांनी या घटनेची दखल घेऊन घटनास्थळी भेट देवून घटनेचा पंचनामा करून संजय लायकर याच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा दाखल केला होता.याच दरम्यान दि.७ नोव्हेंबर २०२० रोजी उपचारादरम्यान उत्तम चौगुले याचा मृत्यू सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे झाला. त्याच्या मृत्यूनंतर पोलीसांनी अज्ञात इसमाविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल करून तपास चालू केला होता.या घटनेचा तपास शिवाजीनगर पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वषेणचे पोलीस ही करत होते. गेल्या दोन महिन्यापासून पोलीस संशयीत आरोपीच्या मागावर होते. त्याचबरोबर या गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे स.पो.नी विकास याच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करत होते. त्यांनी आपल्या खबऱ्यांना ही कामाला लावले होते. घटनास्थळी पोलीसांना कोणताच पुरावा मिळालेला नव्हता. पोलीस या घटनेचा तपास करत असताना घटनेच्या दिवशी उत्तम चौगुले याच्या कोण कोण संपर्कात आले होते. तो कोणाला भेटला त्याच्याशी मोबाईलवरून कोण बोलले याची चौकशी करत होते. पण पोलीसांना कोणताच मागमूस मिळत नव्हता. पोलीसांना घटनास्थळावरून एवढीच माहिती मिळाली होती की, घटनेच्या दिवशी उत्तम चौगुले याचा एक मित्र त्याला भेटायला आलेला होता. पण तो मित्र कोण आहे याची कोणालाच काही माहिती नव्हती. फक्त मयत उत्तम चौगुले हा दारू पित होता. त्याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने सकाळ पासून संध्याकाळपर्यत दारू पित होता. त्याला भेटायला येणारे हे त्याचे मित्र ही दारू पिणारेच होते. एवढया माहितीवरून पोलीसांनी तपास चालविला होता. जवळपास हा तपास दोन महिने चालला होता.या घटनेची माहिती पोलीसांनी मालक संजय लायकर याच्याकडून ही घेतली होती. पण त्यातून काहींच निष्पन्न होत नव्हते.स्थानिक गुन्हे अन्वेषणाचे पोलीसांना त्याच्या खबऱ्याने एक खबर दिली की, मयत उत्तम चौगुले हा दारू चोरून विकत होता. त्याच्याकडे त्या दिवशी दारू पिण्यासाठी म्हणून लिंबू चौकातील नजीर मुल्लाणी हा आलेला होता. पोलीसांना हा एकच क्लयू मिळाल्यावर पोलीस नजीर मुल्लाणी याच्या मागावर होते.पण तो पोलीसांना सापडत नव्हता. घटनेनंतर तो इचलकरंजीतून पळून गेलेला होता.त्याचा मोबाईल ही स्विच ऑफ येत होता.पोलीस त्याच्या पाळतीवर होते.पोलीस उपाधिक्षक बी.बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पोलीसांनी नजीर याचा शोध घ्यायला सुरूवात केली असता. पोलीसांना मंगळवार दि.१२ जानेवारी २०२१ रोजी तो एका गावठी दारू अड्डयावर मिळून आला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे मयत उत्तम चौगले याच्या खूनाविषयी विचारले असता.तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपल्या खाकीचा प्रसाद दिल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करून पोलीसांना सांगितले की मयत उत्तम चौगले याच्याकडे लॉकडाऊनच्या काळात दारू विकत मिळत होती. मी त्याच्याकडून दारू विकत घेत होतो. पण घटनेच्या दिवशी त्याने मला उधारीवर दारू प्यायला दिली नाही. त्यातून त्याचे माझे भांडण झाले. याचा राग मला आलेले होता. म्हणून मी डाव साधून रात्रीच्या वेळी तो संजय लायकर याच्या गोठयात झोपलेला असताना त्याच्या गळ्यावर माझ्याकडील कटनरने त्याच्या मानेवर वार करून त्याचा गळा चिरला आणि मी घटनास्थळावरून पळून गेलो. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन अटक केली.मयत संजय लायकर याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी उत्तम राजाराम चौगुले (वय ४६ मूळ साजणी सध्या .रा.लायकर मळा) नजीर रशिद मुल्लाणी (वय ३५,रा.लिंबू चौक इचलकरंजी) याच्या विरोधात गु.रजि.नं. ५३१/२०२० भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला इचलकरंजी येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक बी.बी.महामुनी अप्पर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पो.निरीक्षक श्रीकांत पिंगळे.स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे स.पो.नी.विकास जाधव, पोलीस उपनिरीक्षक भागवत मुळीक आणि त्याच्या कर्मचाऱ्यांनी केला. या घटनेचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत. अट्टल दारूडयाचे दारूचे व्यसन हे काही केले तर सुटत नाही, त्यातूनच तो सैरभैर होत असतो. त्याला दारू प्यायला मिळाली नाही तर तो कोणत्याही थराला जातो त्यातूनच अशा खूनासारख्या घटना घडतात.हेच या घटनेवरून दिसून येते.

## धंद्यात त्याने दिला नाही ठरलेला ...

हाकलून लावले होते. आता त्याच्यापुढे उदर निर्वाहाचा प्रश्न असल्याने त्याला नात्यातील मावस भावाची आठवण झाली. माणूस गोत्यात आला की त्याच्याकडे सगळेजण पाठ फिरवतात. अशावेळी त्याला नात्यातील जवळच्या माणसाची आठवण येते, तो माणूस आपल्याला नक्कीच मदत करेल या अपेक्षेने ते त्याच्याकडे जातात.मुनीरलाही मावस भावाची आठवण झाली.त्याचा मावस भाऊ राजू गौस हा मिरज येथे रेवणे गल्लीत आपल्या कुटूंबासह राहयला आहे.त्याच्याकडून आपल्याला नक्कीच मदत होईल याची खात्री मुनीर याला होती.म्हणून तो राजू ऊर्फ रियज गौस या आपल्या मावस भावाकडे काम मागण्यासाठी मिरज येथे आला.राजू हा मिरज शहरात कांदा बटाटे,लसून विकत होता.तो या धंदयातील प्रसिध्द व्यापारी होता.त्याला मिरज शहरात 'लसून राजा' म्हणून ओळखले जात होते.त्याच्याकडे त्याचा मावस भाऊ मुनीर शेख आल्याने त्याने ही त्याला मदतीचा हात दिला होता.त्याला आपल्या जवळ ठेवून घेऊन आपला लसून कांदा बटाटे विकण्याचा धंदा त्याला शिकविला.माल कुठून कसा आणयाचा आणि तो मार्केटला कसा चढत्या दराने विकायचा हे सगळे राजू गौसने मुनीरला शिकविले हळूहळू मुनीर ही त्या धंदयात जम बसवू लागला.लसून राजा म्हणून प्रसिध्द असलेला राजू गौस हा मिरजेतील प्रसिध्द व्यापारी असल्याने त्याला इतर धंदयाविषयी आणि दोन नंबर धंदयाविषयी ही माहिती होते.या धंदयात किती पैसे मिळतात हे त्याला चांगले माहिती होती. वाळूची ठेकेदारी करणाऱ्याबरोबर राजू गौस याचा परिचय होता.

त्यातून त्याने मुनीरला वाळू धंदयात घुसविले.याधंदयात त्याला गुंतवत असताना मुनीरला त्याने काही अटी घातल्या होत्या.त्याला वाळुच्या धंदयात जम बसवून देताना त्याला सांगितले होते. या धंदयातून मिळणाऱ्या रक्कमेपैकी महिना दहा हजार रूपये मुनीर याने राजूला दयावे.तसेच मुनीर याची मांगले गावी एक गुंठा जागा आहे ती जागा मुनीर याने राजू गौसला दयावी असे सांगितले होते.मुनीर ही या गोष्टीला तयार झाला होता. त्याने तसे कबुल ही केले होते.त्यानंतरच राजू याने मुनीर याला वाळूच्या धंदयात उतरविले होते.सुरूवातीला काही महिने मुनीर हा राजू याला ठरल्याप्रमाणे वाळुच्या धंदयातून मिळणाऱ्या रक्कमेपैकी दहा हजार रूपये देऊ लागला होता. आता मुनीर हा वाळुच्या धंदयात जम बसवित असताना तो मिरजेत राजू याच्याबरोबर न राहता. मिरजेपासून जवळच असणाऱ्या बोलवाड गावात राहू लागला होता. ताकारी-म्हैशाळ प्रकल्प हा कृष्णा नदीवरील बोलवाड नजीक असल्याने येथे मोठया प्रमाणात वाळूचा उपसा कृष्णा नदीच्या पात्रातून होत असतो. म्हणून मुनीर हा बोलवाड येथे राहत होता. तसे मिरज बोलवाड अंतर हे ४ ते ५ कि.मी अंतरावर असल्याने त्याचे मिरजेत ही येणे जाणे होते. त्याचा वाळूच्या धंदयात बऱ्यापैकी जम बसला होता. त्यातच अलिकडे मुनीर याने राजू याला दरमहा देत असलेले दहा हजार रूपये देणे ही बंद केले होते.तो मिरजेत येऊन देखिल त्याला भेटत नव्हता. त्याचा मोबाईल फोन देखील तो उचलत नव्हता. त्यातून राजूला मुनीर विषयी शंका येऊ लागली होती. सर्व काही सुरळीत सुरू असताना अचानक त्याने रक्कम देणे बंद केल्याने राजूने एकदा त्याची भेट घेऊन या विषयी विचारले असता. त्यावेळी मुनीर याने त्याला काही तरी सांगून वेळ मारून नेली होती. अशातच दोन चार महिने गेले.

त्यातच राजू गौस याला मुनीर याने मांगले गावातील एक गुंठा जागा परस्पर विकल्याचे समजले होते. त्यामुळे तो त्याच्यावर चिडून होता. कारण ती एक गुंठा जागा मुनीर याने राजूला देण्याचे कबुल केले होते.पण त्याने तसे न करता ती जागा परस्पर विकली होती. याबाबतही राजू याने मुनीर याची भेट घेऊन त्याला विचारले असता मुनीर राजूने केलेले उपकार विसरून उलट त्याच्याबरोबर भांडण काढून त्यालाच शिवीगाळ करू लागला.त्यावेळी राजूने काय ओळखयचे ते ओळखले होते. मुनीर याने आपल्याला फसवले आहे याची त्याला जाणीव झाली.आता त्या दोघात या कारणावरून सारखे वाद आणि भांडण होऊ लागले. या भांडणात दोघे ही एकमेकांच्या अंगावर जात होते. आता मुनीर याला कायमचा धडा शिकवयालाच पाहिजे असा विचार राजू करीत होता. त्यामुळे तो तशी संधीची वाट पाहू लागला होता. दोघांना ही दारू पिण्याचे व्यसन असल्याने दोघेही दररोज कुठल्या ना कुठल्या बारमध्ये भेटत होते. त्यावेळी फक्त त्या दोघात नाते असल्याने वर वरचे बोलणे होत होते.पण दोघेही एकमेकाविषयी मनात खुन्नस ठेवून होते.त्या दोघात पैशाचा विषय निघत होता.पण त्यातून मार्ग काही निघत नव्हता.

मिरज शहरात असणाऱ्या हॉटेल सनशाईन येथे ते दोघे रात्री दारू पिण्यासाठी कायम येत होते.तेथेच मुनीर याला दारू प्यायला बोलावून शेवटचे विचारायचे असा विचार राजू याने केला.म्हणून त्याने दि.११ जानेवारी २०२१ रोजी रात्री ८ वाजता मुनीर याला हॉटेल सनशाईन येथे दारू पिण्यास बोलवले होते. त्यावेळी राजु याने घरातून येताना चाकू आपल्या कमरेत लपवून आणला. दोघेही एका टेबलावर दारू पित बसले असताना त्या दोघांची चर्चा रंगात आली होती. दरम्यान ते दोघे दारू पित असताना त्याच्या शेजारी एक ओळखीचा माणूस येऊन बसला होता. त्यामुळे त्या दोघांनी त्यांचा विषय थांबविला होता.तो इसम दारू पिऊन गेल्यावर परत राजू याने मुनीरला मला का फसवले? म्हणून मुनीर याला विचारून दरमहा दहा हजार रूपये ही देत नाहीस. तसेच जागा ही नांवे करून दिली नाहीस असे म्हणून मुनीर याला विचारले असता तो काहींच बोलला नाही. त्यावेळी बारमध्ये तळीरामांची गर्दी ही होती.जो तो आपपल्या रंगात होता. राजू आणि मुनीर याना ही दारूची नशा जास्त झाली होती. दोघेही मोठयाने या विषयावर बोलत असताना एकमेकांना शिव्या देऊ लागले होते. तेवढयात राजू मुनीर याला काही कळायच्या आत उठला आणि त्याच्या समोर जात आपल्या खिशातील लपवून ठेवलेला चाकू काढून त्याच्या मानेवर सपासप असे १४ वार केले. त्या सरशी हॉटेलमध्ये गोंधळ उडाला. दारू पिताना चाकू हल्ला झाला म्हणून बारमधून लोक पळून जावू लागले. तर काहींची दारूची नशाच उतरली. या सगळ्या गोंधळात हॉटेल व्यवस्थपकाला ही काही कळाले नाही.तो ही घाबरलेला होता. वेटर लोक ही धास्तावलेले होते. मुनीर याच्या मानेतून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव चालू झाल्याने शेवटी राजू यानेच त्याला उचलून आपल्या खांदयावर घेतले आणि लगेच त्याला हॉस्पिटलला नेले. त्यावेळी त्याचा ही गोंधळ उडला होता.त्याला त्याने उपचारासाठी ज्या हॉस्पिटलमध्ये नेले ते लहान मुलांचे हॉस्पिटल होते. तेथे त्याच्यावर उपचार होणे शक्य नव्हते. म्हणून लगेच त्याने त्याला एका रिक्षात टाकून मिरज मिशीन हॉस्पिटल येथे नेले. पण त्याला उपचारासाठी दाखल न करता रात्रीच्या अंधारात त्याला मिशीन हॉस्पिटलच्या आवारात टाकून तेथून तो कोणाला काही कळायच्या आत तेथून पळून गेला.इकडे सनशाईन हॉटेलचा व्यवस्थापकाने महात्मा गांधी पोलीस ठाण्याला फोन लावून या घटनेची माहिती दिली. पोलीसांनी घटनास्थळी दाखल होऊन या घटनेची माहिती व्यवस्थापकाकडून घेतली. मिशीन हॉस्पिटल येथे पोलीसांनी भेट दिली असता. तेथील आवारात मुनीर शेख याचा मृतदेह पोलीसांना मिळून आला.स.पो.नी. प्रवीण कुमार कांबळे आणि त्याच्या सहकार्यानी तातडीने घटनास्थळचा पंचनाम करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनसाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवून दिला.या घटनेतील संशयीत आरोपी राजू ऊर्फ रियाज शेख हा पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. घटनास्थळी पोलीस अधिक्षक दीक्षीत गेडाम आणि डी.वाय. एस. पी. आशोक विरकर यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली.तसेच या घटनेतील संशयीत आरोपीला ताब्यात घेण्याच्या सुचना केल्या. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस आधिकारी सर्जेराव गायकवाड, कुलदीप कदम,अभिजीत सावंत, रवीराज फडणवीस हे आरोपीचा कसून शोध घेत असताना राजू ऊर्फ रियाज गौस हा त्यांना दि.१२ जानेवारी २०२० रोजी पहाटे ४ वाजणेच्या सुमारास मिळून आला.पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन महात्मा गांधी पोलीसांच्या ताब्यात दिले.पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला? याची माहिती पोलीसाना दिली.त्याने गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी हॉटेल सनशाईनचा व्यवस्थापक प्रकाश राजकुमार माळकर(वय३१ म्हैशाळ रा.नरवाड रस्ता म्हैशाळ कॉलनी मिरज) याने दिलेल्या फिर्यादीनुसार मुनीर मुसा शेख(वय ३६ रा.मांगले, सध्या बोलवाड मिरज) याच्या खून प्रकरणी राजू ऊर्फ रियाज गौस (वय ४२रा.रेवणी गल्ली मिरज) याच्या विरोधात गुन्हा.रजि.नं.१४/२०२१ भा.द.वी.कलम ३०२, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमारे उभे केले असता.मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणेचे पो.निरी. सर्जेराव गायकवाड,रवीराज फडणवीस, अभिजीत सावंत, कुलदीप कदम, निळे, संजय कांबळे, हेमंत ओमासे, विलास भोसले, सोहेल कार्नोमानी ,सुधीर गोरे शशिकांत जाधव यांनी करून घटनेच्या काही अवधीतच आरोपीला जेरबंद केले.या घटनेचा पुढील तपास महात्मा गांधी पोलीस स्टेशनचे स.पो.नी.प्रवीणकुमार कांबळे हे करत आहेत. नाते कितीही जवळचे असले तरी कोणताही व्यवहार हा जपूनच करावा लागतो नाही तर तो व्यवहार चांगलाच अंगलट येतो . हेच या घटनेवरून दिसून येते.

18 JAN TO 24 JAN 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:33 PM Page 1

C M Y K



## थोडक्यात वृत्तांत

### वृक्षारोपण हे जनचळवळ झाली पाहिजे-स्वामी

देवणी : देवणी येथे विद्यालक्ष्मी फाउंडेशनचा वर्धापण दिन विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला वृक्षरोपन, अन्नदान आणि गरीब होतकरु विध्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हास्ते करण्यात आले. खंडोबा चौक देवणी येथे वृक्षारोपन करताना फाउंडेशन चे संस्थापक आर.के. स्वामी यांनी संस्थेतर्फे वृक्षारोपन केले असुन देवणी तालुक्यात वृक्षांचे प्रमाण फार कमी असुन ते आपण सर्वांनी विविध कार्यक्रमा प्रसंगी वृक्षारोपन करावे व वृक्षारोपन हि जनचळवळ झाली पाहिजे असे उद्‌गार आर.के. स्वामी यांनी काढले याप्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

### कोकण विभागीय लोकशाही दिनी २ तक्रारी दाखल

नवी मुंबई : कोंकण विभागीय लोकशाही दिन आज कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जाची संख्या १६ असून आज निकाली काढण्यात आलेल्या अर्जाची संख्या ०१ तर आज आलेल्या अर्जाची संख्या २ असून एकूण १७ तक्रारी प्रलंबित आहेत.

### लोककला व पथनाट्य संस्थांनी अर्ज करावेत

पालघर : लोककला व पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थांची निवड सूची २० डिसेंबर रोजी संपुष्टात आली आहे. याबाबत नवीन निवड सूची तयार करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील लोककला व पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थांनी निवड सूचीसाठी जिल्हा माहिती कार्यालय, दुर्गा केशव बिल्डिंग, नवली रेल्वे फाटका जवळ पालघर पुर्व ४०१४०४ पालघर येथे २१ जानेवारीपर्यत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव यांनी केले आहे. निवड सूचीसाठी dgipr.maharashtra.gov.in व www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा बरोबरच जिल्हा माहिती कार्यालय, पालघर येथे अर्ज उपलब्ध आहेत. तरी इच्छुक संस्थांनी निवड सूचीसाठीचे अर्ज २१ जानेवारी २०२१ पर्यत सादर करावेत, असे आवाहन ही प्र. जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव यांनी केले आहे.

### लक्ष्मण बिरादार यांचा शिवसेनेत प्रवेश

देवणी : देवणी तालुक्यातील सय्यदपुर येथील लक्ष्मण बिरादार यांनी लातुर येथील पत्रकार भवनात शिवसेनेच्या वतीने ग्रांम पंचायत आढावा बैठक घेण्यात आली होती. यावेळी शिवसेनेचे मराठवाडा संपर्क नेते चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थितीत बिरादार यांनी शिवसेनेत प्रवेश केले. यावेळी लातुर जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी, शोभाताई बेंजरगे, अविनाश रेशमे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लक्ष्मण बिरादार हे गेली पंधरा वर्षापासुन शिवसेनेत काम करत होते मध्यंतरी २०१९ च्या विधासभा निवडणूकित भाजपामध्ये प्रवेश केले होते. परंतु त्यांचे भाजपा मध्ये मन रमले नाही परत शिवसेनेचा शिवबंधन बांधून घरवापसी गेले आहेत! त्यांच्या या प्रवेशाबद्दल देवणी तालुक्यातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावलीसाठी सुचना!

लातूर : राज्य क्रीडा पुरस्कार प्रतीवर्षी शिवछत्रपती जीनवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक जिजामाता पुरस्कार, शिवछत्रपती खेळाडू, साहसी, दिव्यांग खेळाडू पुरसकार देण्यात येतात. याबाबतची नियमावली शासन निर्णया नुसार निर्गमित केलेली आहे. या नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. शिवछात्रपती पुरस्कार नियमावलीच्या सुधारणाबाबत खेळाडू, नागरिक, संघटना यांच्याकडून सूचना व अभिप्राय दि. २२ जानेवारी २०२१ पर्यंत मागविण्यात येत आहेत. पुरस्काराच्या प्रस्तावित सुधारणा नियमावलीची प्रत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या पुरस्कार नियमावलीच्या प्रस्तावित सुधारणांबाबत खेळाडू, नागरिक, संघटना यांनी आपल्या सुचना, अभिप्राय dsysdesk14gmail.com किंवा desk14.dsys- mhgov.in या मेलवर २२ जानेवारी २०२१ रोजी पर्यंत पाठवाव्यात असे आवाहन क्रीडा व युवक सेचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विभागीय उपसंचालक कार्यालय अथवा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, बालेवाडी, पुणे यांचेशी संपर्क साधावा असे आयुक्त, ओम प्रकाश बकोरिया यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

### साखर कारखान्यातील वजन काट्यांच्या तपासणीसाठी भरारी पथकाची स्थापना!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या ऊस वजन काट्यांची तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी भरारी पथकाची स्थापना केली आहे. याबाबतचे आदेश जारी केले आहेत. भरारी पथकात संबंधित तालुक्यातील तहसीलदार हे प्रमुख असतील. वैध मापन शास्त्र विभागाचे वजनमापे निरीक्षक एस.के. बागल (९४०४६१२८१०) हे सदस्य सचिव तर सदस्य म्हणून साखर कारखाना हद्दीतील पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार, लेखा परीक्षक पी. आर. शिंदे (९५५२६७२०११) (पंढरपूर, सांगोला, माळशिरस), लेखा परीक्षक एन.डी. माडे (९९२२८८२४२९) (बार्शी, माढा, करमाळा, मोहोळ), लेखा परीक्षक के.आर. धायफुले (९८२२०८४६७८)(उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मंगळवेढा) आणि शेतकरी प्रतिनिधी यांचा समावेश असेल. भरारी पथकाने स्वयंस्फूर्तीने कारखाना स्थळावर अचानक भेटी देऊन वजन काट्यांची तपासणी करावी. शेतकऱ्यांना वजनाची पावती योग्य प्रकारे दिली जाते का, खात्री करणे. वजन काट्याबाबत गैर प्रकार होत असल्याचे किंवा पोलीस तक्रार असेल तर तपासणी करून कारवाई करावी.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

# देवणी तालुक्यात ३३ ग्रामपंचायतीसाठी १०५ मतदान केंद्रावर ७८.५० टक्के मतदान

## सर्वाधिक मतदान सिंधिकामठ ९३.६६ टक्के सर्वात कमी मतदान धनेगाव ६८.५५ टक्के

**देवणी/शकिल मनियार**

देवणी तालुक्यात ३३ ग्रामपंचायतीसाठी १०५ मतदान केंद्रावर शुक्रवारी दि.१५ जानेवारी रोजी ७८.५० टक्के मतदान झाले. तर तालुक्यात सिंधिकामठ येथे सर्वाधिक ९३.६६ टक्के मतदान झाले आहेत अशी माहिती देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी दिली. देवणी तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतीसाठी १०५ मतदान केंद्रावर एकुण ४४ हजार ५८५ मतदारा पैकी पुरुष मतदार १८ हजार ६४६ व स्त्री मतदार १६ हजार ३७२ असे एकुण ३४ हजार ९९८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.



देवणी तालुक्यात गावनिहाय पुढील प्रमाणे मतदानाची टक्केवारी हंचनाळ ७४.८७ टक्के, संगम ७९.०७ टक्के, वागदरी ७४.०२ टक्के, अजनी ७१.४२ टक्के, सावरगाव ८१.७२ टक्के, देवणी (खुर्द) ८५.४५ टक्के, डोंगरेवाडी ८८.४६ टक्के, होनाळी ७९.५२ टक्के, भोपणी ७७.२० टक्के, मानकी ७८.८७ टक्के, कोनाळी ७५.७२ टक्के, नागराळ ७७.४२ टक्के, कमरोद्दीनपूर ८५.८१ टक्के, गुरधाळ ८६.४७ टक्के, गुरनाळ ८२.८२ टक्के, लासोना ७९.७७ टक्के, बटनपुर ८०.१६ टक्के, गौंडगाव ७९.२० टक्के, सिंधिकामठ ९३.६६ टक्के, आंबेगाव ७६.७४ टक्के, इंद्राळ ७६.७५ टक्के, आनंदवाडी ८६.३८ टक्के, बोळेगाव ८३.६४ टक्के, अंबानगर ८७.५४ टक्के, धनेगाव ६८.५५ टक्के, वलांडी ७७.५७ टक्के, अनंतवाडी ८३.३१ टक्के, जवळगा ६९.९० टक्के, कवठाळ ८४.०० टक्के, नेकनाळ ७७.७५ टक्के, तळेगाव (भो) ७८.७४ टक्के, अचवला ८०.११ टक्के, विळेगाव ८३.०३ टक्के इतके मतदान झाले आहे.

**चार मतदान केंद्रास पोलीस अधीक्षकांची भेट**

देवणी तालुक्यातील वलांडी, तळेगाव (भो), इंद्राळ, हंचनाळ येथील मतदान केंद्रावर मतदाना दरम्यान पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

**वलांडी, गुरनाळ येथे मशीन बंद**

वलांडी येथील मतदान केंद्र ३ मधील मशीन दुपारी ३.२० वाजता बॅटरी इरर मुळे बंद पडली होती अर्ध्या तासात संबंधित यंत्रणेचे कर्मचारी येऊन दुरुस्त केल्याने मतदान पुन्हा सुरू झाले. व तसेच गुरनाळ येथील मतदान केंद्र ३ वरील मशीन अंतिम वेळेत बंद पडली होती तेथे वेळेपुर्वी हजर असलेल्या मतदारांना दुरुस्ती नंतर १० मिनिटे आगाऊ कालावधी देण्यात आला.

## पोलिसांचा बंदोबस्तात जेऊर येथील पंचवार्षिक ग्रामपंचायतीचे मतदान शांततेत



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पोलिसांचा तगडा बंदोबस्त मुळे शांततेत पार पडली आहे. जेऊर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे व श्री काशीविश्वेश्वर हायस्कूलमध्ये मतदान केंद्रावर शांततेत मतदान मतदारांनी केले आहे. यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक केतन मांजरे, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिता काळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल दिलीप राऊत, एएसआय शंकर राठोड, पोलीस नाईक आनंद वाडे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड, अक्षय दळवी, दादा बोडके, महिला पोलीस कॉन्स्टेबल सरस्वती सुगंधी, विजयालक्ष्मी शिवूर, लक्ष्मी माळी, प्रियांका अंबरकर, होमगार्ड नितीन घटकांबळे, बसवराज कुंभारे, गणेश पाटील, खाजप्पा धसाडे यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता. तलाठी राहुल बिराजदार, ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत थोरात, पोलीस पाटील रहेमान अत्तार व ग्रामपंचायत कर्मचारी व कोतवाल यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

## सामूहिक बलात्कार प्रकरणी तिघांना वीस वर्षांची सक्तमजुरी

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

औरंगाबाद येथील मुकुंदवाडी परिसरात ५ ऑक्टोबर २०१७ रोजी एका बाविस वर्षाच्या विवाहितेवर सामुहिक बलात्कार केल्याप्रकरणी तिघा आरोपींना विस वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. विशेष न्यायालयाचे न्या. संजय कुलकर्णी यांनी एससी आणि एसटी (पीओए) कायद्यानुसार सदर शिक्षा सुनावली आहे. सागर सुभाष बुट्टे (२०) रा. जयभवानीनगर, ग. न.५, अनिल अंबादास डुकले (२६) रा. जयभवानीनगर, ग.न.१, उमेश उत्तम डुकले (२२) रा. जयभवानीनगर, ग. न. १ यांचा शिक्षा सुनावलेल्या आरोपींची नावे आहे. जयभवानीनगर चौकात पिडीत विवाहित महिला ५ ऑक्टोबर २०१७ रोजी रात्री ८ वाजता उभी होती. त्यावेळी तिघे आरोपी रिक्षाने आले. विवाहितेस रेल्वे स्टेशनला सोडण्यासाठी त्यांनी तिला रिक्षात बसवले. रिक्षात गॅस भरण्याचे कारण सांगून त्यांनी तिला मुकुंदवाडी येथील रामकाठी येथे नेले. तेथील एका निर्जन खोलीत त्यांनी तिला नेले. अगोदर तेथे त्यांनी महिलेस रॉडने मारहाण केली. त्यानंतर तिच्यावर सामुहिक बलात्कार केला. तसेच जिवे ठार करण्याची धमकी देखील दिली. पीडित विवाहितेच्या तक्रारीनुसार तिघा आरोपीविरोधात रितसर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुकुंदवाडी पोलिसांकडून तिघा आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयीन कामकाजाला सुरुवात झाली होती. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारपक्षातर्फे दहा साक्षीदार तपासण्यात आले. घटनेच्या वेळी पीडितेच्या अंगावर १४ जखमा असलेला वैद्यकीय अहवाल व साक्ष महत्त्वाची ठरली. याप्रकरणी आज शुक्रवारी न्यायालयाने तिघा आरोपींना विस वर्ष सक्तमजुरीसह ९९ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम पिडीतेला मोबदला म्हणून देण्याचे आदेश बजावण्यात आले.

## जायंट्स ग्रुप ऑफ वाडा वैतरणा आयोजित वाडा भूषण आणि गुणगौरव सोहळा संपन्न!

**वाडा/प्रतिनिधी**

जायंट्स ग्रुप ऑफ वाडा वैतरणा या सेवाभावी संस्थे मार्फत अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम दुर्गम भागात राबविले जातात. यामध्ये रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी, मोफत आदिवासी बांधवांचा विवाह सोहळा, शैक्षणिक साहित्याचे वाटप, स्वच्छता हीच सेवा, अवयव दान जनजागृती, एक करंजी प्रेमाची दिवाळी साजरी करू आदिवासी बांधवांची, असे अनेक उपक्रम राबविले जातात. याचबरोबर सामाजिक, शैक्षणिक, कृषीक्षेत्रात, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार वाडा भूषण व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन दरवर्षी केला जातो. सन २०२०चा वाडा भूषण गुणगौरव सोहळा वाड्यातील पंचायत समिती प्रशिक्षण हॉल येथे माननीय हेमंत माधव खिराडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या सोहळ्याचे आयोजन जायंट्स ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष उमेश माधव खिराडे यांनी केले होते. सुवर्णा सुनील पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेऊन त्यांना सन



२०२० चा वाडा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. वाडा भूषण पुरस्कार मिळालेल्या वाड्यातील त्या तिसऱ्या वाडा भूषण ठरल्या आहेत त्याचबरोबर जगदीश पाटील, अबिटघर यांना वारकरी क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल समाज रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच सुजय जाधव, राजेंद्र पाटील यांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विजय बाराथे यांना कार्यतत्पर अधिकारी, वसंत धोंडू भोईर यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार, कमळाकर नानू पाटील यांना कृषी क्षेत्रातील कृषिरत्न पुरस्कार, त्याचबरोबर कोवीड काळात ऑनलाईन ऑफलाईन प्रभावी उपक्रम राबविणारे शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना शिक्षक रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये सुनिता शेलार, कांता गोतारणे, अशोक घागस, किरण पाटील, जयश्री वळसे, अनिल राठोड, तानाजी कोर परशुराम कनोजा, पिनेश जाधव, विणा किणी, हरेश पाटील मयुरा पाटील, रोशनी पाटील, भुरे फैजी मुश्ताक, सुचिता ठाकरे, प्रल्हाद काठोळे, संजय जाधव, बविद्युला पाटील, सायली पाटील, सुप्रिया देशमुख, आशा कासारे यांना शिक्षकरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी योगेश गवा सभापती पंचायत समिती वाडा, जगदीश पाटील, उपसभापती पंचायत समिती वाडा, गीतांजली कोळेकर नगराध्यक्षा, नगरपंचायत वाडा, युवराज ठाकरे, संपादक ज्ञानार्जन आदी उपस्थित होते.

## जिल्ह्याचे पालक सचिव डॉ.संजय चहांदे यांनी घेतला विकास कामांचा आढावा!

**पालघर/प्रतिनिधी**

पाणीपुरवठा व स्वछता विभागाचे अपर मुख्य सचिव तथा पालघर जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. संजय चहांदे यांनी पालघरला भेट देऊन जिल्ह्याच्या विकास कामांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे हा आढावा घेण्यात आला. विविध विभागांच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करणे आवश्यक असल्याचे मत आढावा बैठकीत चहांदे यांनी व्यक्त केले. जिल्ह्यात झालेल्या विकास कामांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. तर प्रत्येक विभागाचा आढावा घेत असताना विभागाला असलेल्या अडीअडचणी जाणून घेतल्या. जिल्हा मुख्यालय उभारत असलेल्या सिडको प्रशासनाकडून त्यांनी अनेक बाबीचा. आढावा घेतला बैठकीच्या सुरुवातीला जिल्ह्यातील करोना स्थितीची माहिती पालक सचिव चहांदे यांनी प्रशासनाकडून घेतली. जिल्ह्यात कोरोना मुळे आता पर्यत झालेले मृत्यू, सद्यस्थितीत दाखल रुग्ण, आता पर्यत बरे झालेले रुग्ण याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यानंतर जिल्ह्यातील महसूल, कृषी, भूसंपादन, क्रीडा, नगररचना, वनहक्क आदी विभागांचा आढावा त्यांनी विभागप्रमुख यांच्याकडून घेतला. आता पर्यत जिल्ह्यात वाटप झालेल्या पिक विम्या बद्दल पालक सचिव यांनी समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन



सभागृहात पार पडलेल्या बैठकीनंतर पालक सचिव यांनी जिल्हा परिषदेच्या संकुल सभागृहात जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्राधान्याने जिल्ह्यातील अंगणवाड्यांची माहिती घेतली. त्यानंतर ग्रामपंचायत विभाग, ग्रामीण विकास यंत्रणा, आरोग्य, पाणी पुरवठा, जलजीवन मिशन अशा विभागाच्या कामकाजाचा व विकासात्मक दृष्टीने होत असलेले काम याचा आढावा घेतला. यावेळी डॉ. संजय चहांदे यांनी प्रत्येक विभागाच्या रिक्त पदांबद्दल माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, वसई-विरार महापालिका आयुक्त डी. गंगाधरन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन सर्व विभागप्रमुख, कर्मचारी आढावा बैठकीस उपस्थित होते.

## वाडा तालुक्यातील खानिवालीत चोरांच्या हल्ल्यात ग्रामस्थ जखमी



**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील खानिवली गावात असलेल्या मोबाईल टॉवर वर चोरीच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यानी येथील रहिवासी असलेल्या मिलिंद पाटील यांच्यावर दगडाने केलेल्या हल्लूयात मिलिंद पाटील हे गंभीर जखमी झाले आहेत. खानिवली गावातील गणेशनगर भागात मिलिंद पाटील आपल्या कुटुंबासह राहत असून बुधवारी पहाटे अडीच ते तीन च्या सुमारास घरानजीक असलेल्या मोबाईल टॉवरजवळ काहीतरी लुडबुड सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पाटील यांच्या घराजवळ असलेला पथदिवा बंद असल्याने हातात बॅटरी घेऊन ते पथदिवा सुरू करण्यास गेले असता चोरांनी त्यांच्यावर समोरून दगडाने जोरदार हल्ला केला. दरम्यान दगडांच्या हल्ल्यात पाटील यांच्या नाकावर गंभीर जखम झाली असून त्यांना तात्काळ वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सध्या त्यांच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनतर्फे बॅरिकेट्स

लातूर : रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने शासकीय रुग्णालयास बॅरिकेट्स प्रदान करण्यात आले. शासकीय रुग्णालयात दररोज हजारो रुग्ण उपचारांसाठी येत असतात. या सर्वांच्या वाहनांची परिसरात मोठी गर्दी होते. हे नियंत्रण मिळवण्यासाठी बॅरिकेट्स उपयोगी पडणार आहेत. रुग्णालयाच्या अपघात विभाग परिसरात ते ठेवले जाणार आहेत. शासकीय रुग्णालयाचे उप अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान, वैद्यकीय अधीक्षक डॉ.संतोषकुमार डोपे यांच्या उपस्थितीत हे बॅरिकेट्स प्रदान करण्यात आले. यावेळी लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अनुप देवणीकर, माजी अध्यक्ष रवी जोशी, महेंद्र दुरुगकर, शशिकांत मोरलावार, क्लब व्यवस्थापन संचालक वीरेंद्र फुंदीपल्ले, कोषाध्यक्ष कपिल डुमणे, पब्लीक इमेज संचालक अमोल दाडगे, सारंग अयाचित, चंद्रकांत बारस्कर यांची उपस्थिती होती. रवी जोशी यांचे भारतीय पुस्तकालय, वीरेंद्र फुंदीपल्ले यांचे कविराज पेंट्स, अमोल दाडगे यांचे शुभदा पेट्रोलियम व कीर्ती एंटरप्राइजेसच्या वतीने या बॅरिकेट्ससाठी सहकार्य करण्यात आले आहे.

## भिवंडीत एक कोटी रुपयांचा गुटखा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

परराज्यातून गुटखा, सुगंधी तंबाखू जन्य आणून विक्री केली जात असल्याची बातमी मिळताच अन्न औषध सुरक्षा विभागाच्या भिवंडी परिक्षेत्राचे सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांनी तालुक्यातील दापोडे येथे एक कंटेनरची तपासणी केली असता गुटखा तस्करी मार्गाने आणलेला आढळून आला. दापोडा ग्रामपंचायत हद्दीत स्विद्दनाथ कंपाऊंड येथे गोदाम समोर उभी असलेल्या संशयित कंटेनर उभा असलेला आढळून आला असता त्या कंटेनर सह गोदमाची तपासणी केली असता त्या ठिकाणी माणिकचंद, दिलबाग, गोवा, राज विलास, हॉट या नावाने विकला जाणार गुटखा सुगंधी तंबाखू यांच्या तब्बल तीनशे गोणी आढळून आल्या असून सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्दसमाल अन्न सुरक्षा विभागाने जप्त करून कंटेनर चालकास ताब्यात घेतले असून त्या विरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला जात असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांनी दिली आहे.

C M Y K

18 JAN TO 24 JAN 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:34 PM Page 1



# चारित्र्य कल्लोळ!

समाजाचं नेतृत्व करणारा माणूस हा पूर्वी चारित्र्यवान असायचा. आपली संस्कृती आणि परंपरा यांच्याशी बांधिलकी ठेऊन तो समाजातील लोकांचा विश्वास जिंकायचा आणि दुधात जशी साखर मिसळते तसाच समाजाशी एकरूप होऊन स्वतःला समाजकार्यात झोकून द्यायचा आणि अशाप्रकारे समाजासाठी वाहून घेतलेली माणसेच पुढे इतिहासात त्यांच्या कार्याने अजरामर ठरली. मग ते छत्रपती शिवाजी महाराज असोत. राष्ट्रपिता महात्मा गांधी असोत की जातीयवादाच्या विरोधात लढून दलीत शोषितांना त्यांचा न्याय हक्क मिळवून देणारे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत! हे सगळे इतिहास पुरुष आज कोट्यवधी भारतीयांचे आदर्श आहेत. पण त्यांच्यावर लोकांनी विश्वास का टाकला? तर ते चारित्र्यवान होते. त्यामुळे बदनामीचा एक शिंतोडा ही त्यांच्या चारित्र्यावर उडालेला नव्हता. आणि सार्वजनिक जीवनातील तेच त्यांचं भांडवल होत. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. सार्वजनिक जीवनात चारित्र्याला कवडीचीही किंमत राहिलेली नाही. कारण राजकीय प्रवासात नेत्यांची गाडी स्टेपनी असल्याशिवाय चालतच नाही. आणि लिव्ह इन रिलेशनशिप किंवा विवाहबाह्य अनैतिक संबंध ही तर आजच्या समाजाची ओळख बनली आहे. कारण घरचा नेहमीचा वरणभात खाऊन माणूस कंटाळलेला असतो. त्यामुळे त्याला ठसठशीत कोंबड्या लागतात. अगदी बर्ड फ्ल्यूची साथ सुरू असली तरी सुद्धा! आणि हे सगळ येवढ्यासाठी सांगावस वाटतंय की सध्या एका मंत्र्यावरील कथित बलात्काराच्या प्रकरणामुळे महाराष्ट्रामधील राजकीय वातावरण तापले आहे. तसे पाहता भारतात पाश्चात संस्कृतीचे अनुकरण सुरू झाल्याने अनैतिक संबंध माणसाच्या जिवनाचाच एक भाग बनलेत. भले त्यातून किती जरी भानगडी, वादविवाद किंवा खून खराब झाला तरी हे आता थांबेल असे वाटत नाही. कारण शारीरिक आकर्षण आणि त्यातून निर्माण झालेली वासना माणसाला स्वस्थ बसू देत नाही. मग तो माणूस कुठल्याही क्षेत्रातला असो, विवाहित असो किंवा अविवाहित असो आपल्या लैंगिक भावनांना तो आवर घालू शकत नाही. त्यातच शालेय जीवनापासून पुढे कामाच्या निमित्ताने स्त्री पुरुष एकत्र येतात आणि कार्यालयात म्हणा किंवा कंपनीत म्हणा, जेंव्हा स्त्री पुरुष एकत्र येतात तेंव्हा त्यांच्या मनात एकमेकांविषयी आकर्षण निर्माण होतेच. अर्थात या सगळ्या नैसर्गिक गोष्टी असल्या तरी सुद्धा माणसाने स्वतःच्या मनावर आणि भवणांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे आणि खास करून राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाने तर चारित्र्याला जपणे खूपच आवश्यक असते. पण गेल्या काही वर्षांचा इतिहास पाहता सर्वाधिक व्यभिचार हा राजकीय क्षेत्रात बघायला मिळतो. अगदी विधिमंडळाच्या अधिवेशनात गपचूप मोबाईलवर ब्ल्यू फिल्म बघण्या इतपत राजकीय पुढारी चावट झालेत. अगदी घरात सुंदर पत्नी असतानाही बाहेर शेण खणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सरकारने गर्भपात करण्यावर जर बंदी घातली नसती तर देशाची लोकसंख्या राजकीय पुढाऱ्यांनीच वाढवली असती. रेणू शर्मा नावाच्या महिलेने जर धनंजय मुंडे यांच्यावर बलात्काराचा आरोप केला नसता तर त्यांनी दुसरी बाई ठेवली आहे आणि तिच्यापासून त्यांना दोन मुलेही आहेत ही बाब महाराष्ट्राला कळलीच नसती. धनंजय मुंडे हे सामाजिक न्यायमंत्री आहेत. मात्र त्यांची ही सामाजिक भानगड पाहिल्यावर बाकीच्या मंत्र्यांकडे सुद्धा लोक संशयाने बघायला लागले आहेत. तसे सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरणाचा चौकशीत एका तरुण मंत्र्यावर सुशंतच्या सहकारी महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यावर बलात्काराचा आरोप होण्याचे हे दुसरे प्रकरण आहे. यात आश्चर्याची गोष्ट अशी की बलात्काराच्या या भानगडी तीन चार वर्षांनी उजेडात येतात आणि पीडित महिलाच त्या उघडकीस आणतात. पण चौकशीत आता असे दिसून आले आहे की ज्या स्त्री पुरुषाचे प्रेम संबंध असतात त्यांच्यात राजीखुशीने शरीर संबंध घडलेले असतात. आणि त्यांना मजा वाटत असते, पण काही कारणावरून फिस्कटल की मग ती महिला आपल्यावर बलात्कार झाल्याचा कांगावा करीत पोलिसांकडे धाव घेते. धनंजय मुंडेंच्या बाबतीत असेच झाले असावे. कारण ज्या महिलेने धनंजयवर बलात्काराचा आरोप केला आहे तिची मोठी बहीण धनंजय सोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये होती आणि त्यांना दोन मुलेही आहेत आणि धनंजयने हे स्वतः कबुल केलंय. इतकाच नव्हे तर आपल्यावर बलात्कार करणारी महिला आपल्याकडे सतत पैशाची मागणी करून आपणास ब्लॅककमेल करीत होती असेही धनंजयचे म्हणणे आहे आणि तसे असेल तर कदाचित या कथित मेव्हणी सोबतही धनंजयचे तिच्या सहमतीने संबंध आले असतील. त्यामुळे हा सगळा प्रकार काही नवीन किंवा गांभीर्याने घेण्यासारखा नाही, पूर्वी अशा गोष्टी बॉलीवुडमध्ये चालायचा आता राजकारणातही सुरू झाल्यात. मात्र सहमतीने केलेले शरीर संबंध हा बलात्कार नाही असा निकाल यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे बलात्काराचे हे कथित प्रकरण थोडे दिवस मीडियामध्ये चाघळले जाईल आणि नंतर शांत होईल. आणि आजकाल बॉलिवूड असो की राजकीय क्षेत्र असो नितिमत्ता लोकांमध्ये राहिलेली नसल्याने चारित्र्य नावाच्या शब्दाला कवडीचीही किंमत राहिलेली नाही. आणि तसेही आता लिव्ह इन रिलेशनशिपमुळे विवाह संस्था मोडीत निघाल्या आहेत. परिणामी कोण कुणाशीही कितीही वर्ष मौजमजा करण्यासाठी एकत्र राहू शकतात. मन भरल की बाजूला व्हायचं आणि दुसरा बकरा किंवा बकरी शोधायची. समाज पूर्णपणे व्यभिचारी झालाय. वयात आलेल्या तरुण पोरांना पोरी ऐवजी लग्न झालेल्या बायका आवडायला लागल्या इतकी विकृती समाजात फोफावली आहे. त्यामुळे आणखी काही वर्षाने कुत्रा-कुत्रीचा जागी रस्त्यावर तशा अवस्थेत माणसे दिसू लागतील. येवढं समाजाचं अनधापन झालेलं आहे. माणसाने बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये बदल करायलाच हवा, याबाबत दुमत नाही. मात्र हा बदल आपल्या सामाजिक जीवनाला कलंकित करणारा असता नये. प्रत्येक बदल हा माणसाच्या जीवनाला स्थैर्य, सुख, शांती आणि समाजातील त्याची प्रतिमा उंचावणारा असायला हवा. मात्र आजकाल माणूस पैसा आणि भौतिक सुखाच्या सतत मागे असल्याने त्यानुसारच त्याची मानसिकता बदलत चालली आहे आणि स्त्री देहाच्या आकर्षणातून तो सतत वासनेच्या आहारी जाऊन व्यभिचारी बनतोय. परिणामी घरात हक्काची पत्नी असतानाही त्याला उकिरडे हुंगण्याचे व्यसन लागले आहे आणि त्यातूनच निती अनिती यातला फरक तो विसरून गेलाय आणि आता तर अनैतिक संबंध हा त्याच्या जीवनाचा एक भाग बनला आहे. त्यातूनच समाजात धनंजय मुंडे सारख्या प्रवृत्ती जन्माला येतात. रेणूने धनंजयवर केलेले बलात्काराचे आरोप जरी खोटे असले तरी विवाहित असताना त्याने रेणूंच्या बहिणीशी अनैतिक संबंध ठेवणे आणि त्याची उघडपणे कबुली देणे हे सार्वजनिक जीवनात चालणारे नाही. लोक अशा गोष्टींना कदापि स्वीकारणार नाहीत.

# क्रांतिकारी लसीकरण!



२०२० हे वर्ष कोरोना वर्ष म्हणून इतिहासात ओळखले जाईल. कारण गत वर्षात कोरोनाने जगभर हाहाकार माजला होता. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण जगात लॉकडाऊन करण्यात आला आणि या लॉकडाऊनमध्ये सगळे उद्योग धंदे बंद ठेवण्याची पाळी आल्याने संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था कोलमडून पडली होती. जवळपास एक कोटी लोकांचा कोरोनाने बळी घेतला. त्यामुळे कोरोनाची ही भयानकता लक्षात घेऊनच गेल्या अनेक महिन्यांपासून जगभरातील शास्त्रज्ञ कोरोना प्रतिबंधक लस बनवण्यासाठी संशोधन करीत होते. आणि तब्बल आठ महिन्यांनी का होईना भारतासह काही देशांना कोरोना प्रतिबंधक लस बनवण्यात यश आले.

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

भारतातील सिरम इन्टीट्यूटमध्ये जेंव्हा ही लस बनल्याचे लोकांना समजले तेंव्हा लोकांच्या आनंदाला सीमा राहिली नाही. पण काही राजकीय नेत्यांना या कोरोना लसीमध्ये सुद्धा राजकारण दिसू लागले. ही लस भाजपची असल्याने आपण ती घेणार नाही असे एका नेत्याने जाहीरपणे सांगून टाकले. तर दुसऱ्या पक्षाने या लसीवर संशय व्यक्त करताना ही लस अगोदर मोदींनी घ्यावी, नंतर आम्ही घेऊ असे सांगून टाकले.

डॉक्टर, शास्त्रज्ञ, कलावंत, पत्रकार हे सहसा कुठल्या पक्षाचे नसतात. त्यांची आपल्या व्यवसायाशी बांधिलकी असते, तरी सुद्धा अशा लोकांविषयी संशय घेऊन त्यांच्या विषयी गैरसमज पसरवले जातात. सिरम इन्टीट्यूटची लस ही अनेक महिन्यांच्या संशोधनाच्या नंतरच बनवण्यात आली. त्या लसीच्या अनेक चाचण्या झाल्या जागतिक आरोग्य संघटनेने सर्व संबंधित संघटनांची मान्यता मिळाल्या नंतरच सरकारने ही लस लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक ती सर्व यंत्रणा उभारली आणि शनिवारी विविध केंद्रांवर प्रत्यक्षात लसीकरणाला सुरुवात झाली. भारतातील हे क्रांतिकारी लसीकरण असल्याने देशवासीयांनी या लसीकरण मोहिमेत भाग घेऊन केवळ सरकारवरच नव्हे तर आपल्या शास्त्रज्ञांवर विश्वास दाखवायला हवा! कारण ही लस संशोधकांनी बनवली आहे आणि हे संशोधक कुठल्याही पक्षाचे नव्हते. केवळ कोरोनापासून अखंड मानव जातीचे रक्षण व्हावे या एकाच ध्येयापोटी त्यांनी दिवस रात्र एक करून ही लस बनवली. त्यामुळे लसीच्या खरेपणावर राजकारण्यांनी संशय घेऊ नये. कोरोना प्रतिबंधक लसीची देशवासी मोठ्या आतुरतेने वाट पाहत होते. त्यामुळे या लसीकरणाला शनिवारी पहिल्याच दिवशी प्रचंड प्रतिसाद मिळाला. तीन टप्प्यात दिली जाणारी ही लस पहिल्या टप्प्यात कोव्हीड योद्धांना दिली गेली. कारण लॉकडाऊनच्या काळात या कोव्हीड योद्धांनी जीवावर उदार होऊन कोरोना बधिताची सेवा केली. त्यात कित्येक कोव्हीड योद्धांचा मृत्यूही झाला. त्यामुळे सर्वांत प्रथम त्यांचं लसीकरण होणे गरजेच होते.

कोरोनाचं सर्वाधिक प्रभाव दिल्ली आणि मुंबई शहरात होता. त्यामुळेच कदाचित महाराष्ट्राला सुरवातीला ५० हजार तर दिल्लीला ३१ हजार डोसचे वाटप करण्यात आले. राज्यात २८५ केंद्रावर ही लसीकरण मोहीम राबवण्याचे काम सुरू झाले आहे. कोरोनावर लस येईपर्यंत लोकांच्या जीवात जीव नव्हता. पण आता मात्र लोकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी या लसीकरणाकडे राजकारणाच्या चष्म्यातून न पाहता एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पहावे आणि या लसीकरण मोहिमेसाठी सरकारला सहकार्य करावे.


जिथे जीवन मरणाचा प्रश्न आहे तिथे सहसा कुणी राजकारण करू नये. कारण कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जेंव्हा लॉकडाऊन करण्यात आले होते, त्या कालावधीत अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. लोकांवर उपाशी मरण्याची पाळी आली होती. तेंव्हा कुठलाही नेता लोकांना मदत करायला पुढे आला नाही. पण आता कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध झाल्यावर मात्र त्या लसीचे राजकारण करायला एक एक पुढारी पुढे येतोय. त्यामुळे अशांना खरे तर जोड्यांनी मारायला हवे.

प्रत्येक गोष्टीत राजकारण कसले करताय. तुम्हाला ही लस असुरक्षित वाटत नसेल तिच्यावर विश्वास नसेल तर तुम्ही घेऊ नका! पण या लसीविषयी लोकांमध्ये गैरसमज पसरवू नका. लोकांमध्ये भीती पसरवू नका. कारण अगोदरच कोरोनाच्या दहशतीमुळे लोक संभ्रमित झाले होते, त्यांच्यात आणखी संभ्रम निर्माण करू नका!

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# व्हॉट्सॲप वापरावे का सिग्नल?

**दिशायन**



व्हॉट्सॲपच्या नव्या पॉलिसीबद्दल सध्या सगळ्याच मित्र मंडळी, कुटुंबीय आणि कार्यालयीन चॅट रुम अर्थात ग्रुपमध्ये चर्चा सुरू आहे. फेसबुकची मालकी असलेल्या इंस्टेंट मेसेजिंग ॲप म्हणजे व्हॉट्सपने आपली टर्म्स आणि प्रायव्हसी पॉलिसीला अपडेट केले आहे. याचे नोटिफिकेशन अर्थात सूचना भारतात ५ जानेवारीपासून वापरकर्त्यांना देण्यात आल्या. ८ फेब्रुवारीपासून ही नवी पॉलिसी लागू होणार आहे. त्यामुळे यापूर्वीच पॉलिसीतील नियम व अटींचा स्वीकार करणे अनिवार्य असणार आहे. अन्यथा, आपले व्हॉट्सॲप अकाउंट डिलीट होणार असल्याचे सांगितले आहे. नव्या पॉलिसीची सूचना आल्यानंतर सर्वच माध्यमांवर याविषयी चर्चा सुरू झाली. व्हॉट्सॲपची नवी पॉलिसी तुम्ही स्वीकारली असेल तर, तुमची गोपनीय माहितीची गुप्त राहिलेली नाही. देशात बर्फवृष्टी पाहायला, तुम्ही मनाली जात आहात की शिमल्याला ही माहिती तुमच्या मित्र मंडळींना एकवेळ मिळणार नाही. मात्र व्हॉट्सॲपला नक्की मिळेल. तुम्ही व्हॉट्सॲपद्वारे सतत ट्रॅक होणार. तुम्ही कोणत्या ठिकाणी आहात, व्हॉट्सॲप कॉलिंगवरून कोणाशी संपर्क साधता, काय बोलता, कसले आर्थिक व्यवहार करता याची माहिती व्हॉट्सअपवर असेल. व्हॉट्सअपचं प्रत्येक व्हर्जन युजर्सची चिंता वाढवते आहे. नवी पॉलिसी स्वीकारल्यावर, आपली गोपनीय माहिती सार्वजनिक होईल. अशा आशयाच्या बातम्या अनेक ठिकाणी प्रसिद्ध झाल्या यामुळे नागरिक घाबरले. अनेक जण व्हॉट्सॲप सोडून इतर ॲप वापर सुरू करण्याबाबत विचार करू लागले. मुळात आपण आपले जीपीएस बंद ठेवले तरी आपण कुठे कुठे जातो हे ट्रॅक होत असते. आपले कॉन्टॅक्ट नंबर, मेसेज, पैशांची देवाण घेवाण, कॉल रेकॉर्डिंग होतच असते. गुगल, सरकार आणि इतर कंपन्या ही सर्व माहिती आई अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे गोळा केली जाते. तिचा वापर केला जात नाही असा दावा सर्वजण करतात. तसेच या नव्या पॉलिसीत म्हटले आहे. फेसबूक आपला व्यवसाय वाढवण्यासाठी हे करत आहे. त्यांच्या विरोधात अनेक बातम्या पाहून त्यांनी माहितीचा गैरवापर करणार नाही याबाबत जाहिरातीही दिल्या. आता प्रश्न उरतो, व्हॉट्सपचा वापर करावा की आणखी कोणत्या पचा वापर करावा. आपण व्हॉट्सप वापरतो कारण, हे प सर्वजण वापरतात, सर्वांमध्ये लोकप्रिय आणि फुकट आहे. इतर प तेवढे वापरण्यास सोपे, लोकप्रिय, जनमान्य नाहीत. या काही दिवसांमध्ये टेलिग्राम, जिओ चॅट, वाईबर इत्यादी पर्याय व्हॉट्सप साठी दिले जात आहेत. खरेतर हाईक सुध्दा भारतीय पर्याय होता मात्र हे ॲप बंद होत आहे. पण गल्लीपासून दिल्लीपर्यंत सिग्नल याच पची चर्चा सर्वत्र होत आहे.

व्हॉट्सॲप आणि सिग्नल या दोन्हीचा कोफाउंडर ब्रायन अक्टन नावाचा माणुस आहे. फेसबुकने व्हॉट्सॲप विकत घेतल्या नंतर २०१७ मध्ये ब्रायन व्हॉट्सॲपमधून बाहेर पडला. व्हॉट्सॲपचे मॉनिटायझेशन कसे करावे यावर मतभेद झाले होते. त्यासाठी त्याने त्याला मिळणाऱ्या ८५० मिलीयन डॉलर्सवर पाणी सोडले. पुढे अक्टन यांनी सिग्नल फाऊंडेशन सुरू केलं आणि ५० मिलीयन डॉलर्स गुंतवून सिग्नल हे अप तयार केलं. सिग्नल फाऊंडेशन ही एक नॉन प्रॉफिट संस्था आहे. आणखी एक गम्मत म्हणजे सुरक्षित कम्युनिकेशन साठी व्हॉट्स अप आणि सिग्नल ही दोन्ही अप्स एकच सेक्युरीटी प्रोटोकॉल अर्थात सुरक्षा नियमावली वापरतात. दोन्हीमध्ये एंड टु एंड एनक्रिप्शन आहे. एंड टु एंड एनक्रिप्शन म्हणजे आपण पाठवलेला मेसेज ज्याला पाठवला आहे तोच फक्त डिक्रीप्ट करु शकतो बाकी कुणीही नाही, अगदी हे अप्स स्वत:ही पाहू शकत नाहीत. शिवाय तुम्ही शेअर केलेली माहिती फक्त आणि फक्त त्याच फोनवर साठवली जाते. आय-क्लाऊड, गूगल ड्राईव्ह अशी कुठेही नाही. मात्र सिग्नलचा मेटा डेटा पण एनक्रीप्टेड असतो. मेटा डेटा म्हणजे, आपण पाठवलेल्या डेटाबद्दलची माहिती होय. जसा की कुणी कुणाला किती वाजता मेसेज पाठवला, किती जणांना पाठवला, किती वेळा पाठवला इत्यादी डेटा एनक्रीप्टेड असल्याने सरकार, पोलीस किंवा कुणीही हा डेटा बघू शकत नाही. त्यामुळे सिग्नल गोपनीयता अधिक जपत असल्याचे दिसून येते. सिग्नल हे कोणत्याही सोशल मीडिया सोबत जोडलेले नाही आहे. पण व्हॉट्सॲपप्रमाणे स्टेटस ठेवण्याचे फीचर यात नाही आहे. सध्या जगभरात याचे २ कोटी ॲक्टीव्ह युजर्स आहेत. आयओएस, गूगल, विंडोज आणि अगदी लिनक्सवरही सिग्नल उपलब्ध आहे. सिग्नल फ्री तर आहेच. शिवाय यात जाहिराती नाहीत आणि ऑनलाईन जाहिरातदारांना तुमची माहिती विकलीही जात नाही. पण नेमके कोणते वापरावे की व्हॉट्सपच वापरावे हा सर्वस्वी प्रश्न आपण स्वतः घ्यायचा आहे.

# लातूर जिल्ह्यात प्लास्टिक मांजा व प्लास्टिक यावर कायमस्वरूपी बंदी -जिल्हाधिकारी बी.पी.पृथ्वीराज

**लातूर/करकरे आंबादास**

लातूर जिल्ह्यात प्लास्टिक मांजा किंवा प्लास्टिक वस्तुंचा वापर करुन बनविण्यात आलेल्या व सर्वसाधारण नायलॉन परिचित असलेल्या पक्क्या धाग्यामुळे पक्षी व मानव जिवितास इजा पोहचली जाते काही प्रसंगी त्या इजा प्राणघातक ठरतात. त्यामुळे पतंग उडवण्याच्या नायलॉन मांजा पाण्यामुळे होणा-या प्राणघातक इजापासून पक्षी व मानव जिवितास संरक्षण करण्याची गरज आहे. आणि ज्याअर्थी, पतंगासह तुटलेल्या नायलॉन मांजाच्या धाग्यांचे तुकडे जमिनीवर पडतात व सदर नायलॉन मांजाचे तुकडे लवकर विघटन होण्याजोगे नसल्याने गटारे व नदी नाल्यासारख्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण करतात. तसेच गाय अथवा तत्सम प्राण्यांनी नायलॉन मांजाचे तुकडे समाविष्ठ असलेले खादय सेवन केल्यामुळे त्यांना गुदमरण्याचा त्रास होतो. अशाप्रकारे सदर धाग्यांमधील मांज्यामधील प्लॅस्टिकच्या वस्तुंमुळे विविध प्रकारचे दुष्परिणाम होतात. आणि ज्याअर्थी, अशा अपघटन न होऊ शकणाऱ्या प्लॅस्टिकच्या धाम्यांचा अती वापर व विजेच्या तारावरील घर्षणामुळे होणाऱ्या ठिणग्यांनी आग लागून विजप्रवाह खंडीत होतात तसेच विज केंद्र बंद पड़तात, अपघात होतात, वन्यजीवांना धोका पोहचलो तसेच जीवितहानी होण्याचा संभव असतो. त्यामुळे अशा दुर्मिळ व नष्टप्राय होतू घातलेल्या निष्पाप पक्षांचे सरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याअर्थी, मी पृथ्वीराज बी. पी. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी लातूर पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम ०५ च्या अंमलबजावणीस्तव शासनाने संदर्भ क्र. ०२ अन्वये निर्गमित केलेल्या निर्देशांचे अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. प्लॅस्टिक किंवा इतर कृत्रीम वस्तुपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या वापर पतंग उडविण्याच्या मकरसंक्रात या सणाच्यावेळी तसेच इतर वेळी करण्यास त्याचप्रमाणे



नायलॉन मांज्याची धाग्यांची निर्मिती, विक्री, साठवणूक व वापर करण्यास संपूर्ण लातूर जिल्हयात कायमस्वरूपी बंदी घालण्यात येत आहे. संपूर्ण लातूर जिल्हयातील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी तसेच साठवणूकदार यांना नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समुह, यांचेवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ चे कलम १५ मध्ये नमूद तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील. तसेच लातूर जिल्हयातील सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी व ग्रामीण) यांनी तसेच पोलीस विभागाने पथके गठीत करुन प्रस्तुत आदेशाची प्रभावी अंमलबजावणी त्यांचे कार्यक्षेत्रात करावी.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

18 JAN TO 24 JAN 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:34 PM Page 1



# मुंबईच्या विकासाची लढाई जिंकूच -उद्धव ठाकरे

## सागरी किनारा मार्गाचे दोन महाबोगदे खणणारे 'मावळा' टीबीएम मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कार्यान्वित





**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोना विरुद्धची लढाई यशस्वी केल्यानंतर आता मुंबईच्या विकासाची लढाई सुरु झाली आहे. मुंबईच्या विकासाची लढाई आपण नक्की जिंकूच आणि यासाठी जगात उपलब्ध असलेले सर्वोत्तम असे, जे जे तंत्रज्ञान, विज्ञान असेल ते आणण्याची आपली परंपरा कायम ठेवणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. बृहन्मुंबई महापालिकेच्या सागरी किनारा मार्गासाठी दोन महाबोगदे खणणारे 'मावळा' हे संयंत्र मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. यावेळी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, बृहन्मुंबई महापालिकेच्या अतिरीक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) अश्विनी भिडे, एल अँड टी कंपनीचे कार्यकारी उपाध्यक्ष एस. व्ही. जोशी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, कोरोनाच्या लढाईत बृहन्मुंबई महानगरपालिकेने जगाने दखल घ्यावे असे काम केले आहे. आता मुंबईकरांच्या विकासाच्या लढाईतही आपण असेच पुढे राहू. त्यासाठी या लढाईत अशा अनेक 'मावळ्यांची' कामगिरी महत्त्वाची ठरेल. मुंबईच्या दृष्टीने आजचा हा समाधान देणारा आणि महत्त्वाचा क्षण आहे. २०१२ पूर्वीच आपण या समुद्री मार्गाची संकल्पना मांडली होती. वांद्रे- वरळी सी-लिंकलाच पुढे जोडणारा हा मार्ग असेल, अशी संकल्पना होती. मुंबईला सुंदर असा समुद्र किनारा लाभला आहे. परंतु मुंबईत क्षितीज म्हणजे सी लिंक अशी ओळख भविष्यात होऊ नये यासाठी हा मार्ग भुयारी पद्धतीने तयार करण्याचा निर्णय घेतला. महापालिकेने कोस्टल रोडच्या उभारणीसाठी अप्रतिम असे नियोजन केले होते. कामही धुमधडाक्यात सुरु केले होते. परंतु मध्येच कोरोनाचे संकट आले. अजूनही ते गेलेले नाही. या काळात अनेक गोष्टी ठप्प झाल्या असतानाही, या कोस्टल रोडचे काम मंदावू दिलेले नाही, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. कोणतेही काम पुढे नेताना केवळ नेता असून भागत नाही. त्यासाठी लढवय्या मावळ्यांची गरज असते. तसे या कामात मावळा यंत्राचे काम असेल. त्याबरोबर रणांगणात मावळे लढत असतात. तसे बृहन्मुंबई महापालिकेच्या या कामात आयुक्तांपासून ते वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ, हे काम करणारी कंपनी, अभियंते, कर्मचारी हे सगळेच असे मावळे आहेत. बृहन्मुंबई महापालिका वेळेआधीच काम पूर्ण करेल, याची मला खात्री आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री ठाकरे यांनी बृहन्मुंबई महापालिकेच्या कामांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयुक्त चहल यांनी केले तर आभारप्रदर्शन श्रीमती भिडे यांनी केले.

**मावळा मशीन नेमके काय आहे?**

बोगदा खणणारे मावळा मशीन (टीबीएमचा) हे या प्रकल्पातील महत्त्वाचे साधन आहे. या टीबीएम मशीनला मावळा' असे नाव देण्यात आलं आहे. हे अजस्त्र यंत्र १२.१९ मीटर व्यासाचे आहे. देशात आतापर्यंत वापरण्यात येणारे सर्वात मोठ्या व्यासाचे टीबीएम मशीन आहे. तयार होणाऱ्या ११ मीटर बोगद्यात सर्व सुरक्षेची व्यवस्था असेल. अरबी समुद्राखालील तब्बल १७५ एकर जमिनीवर भराव टाकण्यात आला आहे. तर अजून १०२ एकर समुद्राखालील जमिनीवर भराव टाकण्यात येणार आहे. या मार्गावर समुद्राखालून ४०० मीटरचे बोगदे असतील. हे बोगदे खोदण्याचे काम मावळा करणार आहे. महाबोगदे खणण्याची सुरुवात प्रियदर्शनी पार्क येथून करण्यात आली. हे बोगदे प्रियदर्शनी पार्क ते नेताजी सुभाष मार्गालगत (मरिन ड्राईव्ह) असणाऱ्या 'छोटा चौपाटी'पर्यंत असणार असून ते 'मलबार हिल' च्या खालून जाणार आहेत. दोन्ही बोगदे हे जमिनीखाली १० मीटर ते ७० मीटर एवढ्या खोलीवर असणार आहेत. दोन्ही बोगद्यांची लांबी ही प्रत्येकी २.०७ किलोमीटर इतकी असणार आहे. भारतातील महानगरांमधील रस्ते बोगद्यांमध्ये अशा प्रकारची यंत्रणा भारतात पहिल्यांदाच बसविण्यात येणार आहे. सागरी किनारा मार्गाच्या एकूण कामापैकी २० टक्के काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. शामलदास गांधी मार्गावरील उड्डाणपूल (Princess street flyover) ते वरळी या दरम्यान १०.५८ किमी लांबीचा हा 'सागरी किनारा मार्ग' असेल.

# वृषाली पाटील यांच्या बालकादंबऱ्यातून वैज्ञानिकतेचा जागर -डॉ.राजशेखर सोलापुरे



**लातूर/प्रतिनिधी**

सोशल माध्यमांच्या आणि मोबाईल गेमच्या आहारी गेलेल्या बालकांवर ग्रामसंस्कृतीच्या मुल्यांचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संस्कार करणार्या व जागर घालणार्या दोन बालकादंबर्या म्हणजे वृषाली पाटील लिखित 'अंधारातील डोळे' आणि 'पक्षी गेले कुठे ?' या आहेत, असे प्रतिपादन ख्यातनाम वक्ते व लेखक डॉ.राजशेखर सोलापुरे यांनी केले. भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृषाली विक्रम पाटील लिखित अंधारातील डोळे आणि पक्षी गेले कुठे? या दोन बालकादंबर्यांच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अनुवादक व साहित्यिक डॉ.सूर्यनारायण रणसुभे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून लेखिका सुनिता आरळीकर, प्रा.विक्रम पाटील, बालकादंबरीकार वृषाली पाटील आणि डॉ.दुष्यंत कठारे हे होते.

पुढे बोलताना डॉ.सोलापुरे म्हणाले की, बालकांची जिज्ञासा जागृत करण्याची व्यवस्था प्रत्येक घरातून निर्माण झाली पाहिजे तरच आभासी जगात गुंतणाऱ्या बालकांना माणूसपणाचे शिक्षण देता येईल. ग्रामीण शब्द व संस्कृती ही आज हरवत चालली आहे. त्याचे कारण ग्रामीण शब्दांशी बालकांचा परिचय नाही त्यांची नाळ गावासोबत आणि मातीसोबत जोडण्यासाठी बालकादंबरीतून प्रयत्न झाले पाहिजेत. बालकांना अंधश्रद्धेच्या गर्तेत जाऊ द्यायचे नसेल तर त्यांना विज्ञानाचे धडे द्यावे लागतील आणि ते साहित्यातून दिले गेले तर त्यांचे भावविश्व समृद्ध होऊ शकेल. अध्यक्षीय समारोपात डॉ.सूर्यनारायण रणसुभे म्हणाले की, बंगाली भाषेत विपूल प्रमाणात बालसाहित्य आहे. मराठीत बालसाहित्य हे सकस स्वरूपात उपलब्ध नाही. साहित्यिकांनी आपल्या लेखनीतून असे बालसाहित्य साकारावे.

बालसाहित्य लिहीणे ही अवघड गोष्ट आहे. मराठी लेखकांनी याकडे लक्ष द्यावे. या प्रसंगी सुनिता आरळीकर यांचेही भाषण झाले. वृषाली पाटील यांनी लेखनामागील भूमिका व्यक्त करताना यातील अंधारातील डोळे ही कादंबरी सत्य घटनेवर अवलंबून आहे तर पक्षी गेले कुठे? ही कादंबरी कॉर्क ल्यूसी यांच्या सिद्धांतावर आधारलेली आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेजा कारंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अविनाश पाटील यांनी केले.

# वळसंगजवळ कंटेनरने दुचाकीला उडवले; अपघातात तिघांचा मृत्यू





**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावरील वळसंग, कुंभारी दरम्यान कंटेनर चालकाने चार वाहनांना धडक देत कंटेनर वेगाने चालविला. यामध्ये झालेल्या अपघातात वळसंग येथे दोघांचा व कुंभारी येथे एकाचा मृत्यू झाला आहे, तर चारजण जखमी झाल्याची दुर्घटना शुक्रवारी रात्री नऊच्या सुमारास घडली आहे. रात्री उशिरा संतप्त नागरिकांनी कुंभारी येथे रास्ता रोको केला. तरुणांच्या डोक्यावरून कंटेनरचे चाक गेल्याने वळसंगचे दोघेही तरुण जागीच ठार झाले आहेत. या अपघातात ठार झालेल्या तरुणांची नांवे सकलेन महंमद कासीम कुरेशी (वय२० रा.वळसंग, ता दक्षिण सोलापूर), रोहित बाळू चौगुले (वय २३ रा.वळसंग ता.दक्षिण सोलापूर) असे असून व तिसऱ्या मृत व्यक्तीचे नाव समजू शकले नाही. मृत तिघांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच कुंभारी येथील सुभाष इरप्पा छपेकर (वय ५०) व अमित छपेकर हे दोघे जखमी झाले आहेत. कंटेनर (जीजे २७ टीटी ०१४५) हा अक्कलकोटहून सोलापूरच्या दिशेने निघाला होता. या कंटेनर चालकाने रस्त्यात येताना दुचाकी, कार, एसटी या वाहनांना ठोकून कंटेनर वेगाने निघाला होता. वळसंग जवळ येथे काही जणांना ठोकून तोगराळी जवळ एका कारला धडकला. त्यानंतर कंटेनर कुंभारी या ठिकाणी एका दुचाकीस्वारास धडकून कमानी वर आदळला. या अपघातामध्ये दोन तीन जण जखमी झाले आहेत. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले, फौजदार अजय हंचाटे व पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली, नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी जखमी झालेल्याना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले करीत आहेत.

# अशोकभाऊंची लाभली साथ गिर्यारोहकास मदतीचा हात!



**जळगाव/प्रतिनिधी**

आफ्रिका खंडातील सर्वोच्च अशा किलोमाजरो शिखरावर २६ जानेवारी रोजी तिरंगा फडकवण्यासाठी गिर्यारोहकांचे पथक जाणार आहे. या गिर्यारोहकांच्या पथकात बालाघाट येथील अनिल वसावे (ता.अक्कलकुवा) यांची निवड झाली आहे. अनिल वसावे यांच्या स्वप्नांना जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि. व भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या रुपाने अशोक जैन यांचा मोलाची साथ आणी मदतीचा हात मिळाला आहे. काही दिवसांपूर्वी सोशल मिडीयावर अनिल वसावे यांची बातमी प्रकाशित झाली होती. त्याचवेळी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी या उपक्रमासाठी योग्य ते सहकार्य करण्याचे ठरवले होते. आर्थिक सहकार्यासोबत हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती साधन-सामग्री देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३६० एक्सप्लोअरच्या वतीने २० ते २६ जानेवारी या कालावधीत 'किलोमांजरो' सर केले जाणार आहे. एव्हरेस्ट वीर आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आनंद बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या चढाईसाठी विविध स्पर्धेतून भारतातील दहा गिर्यारोहकांची निवड झाली आहे. या गटात अनिल वसावेंची निवड करण्यात आली आहे. अनिल वसावे अतिदुर्गम भागातील बालाघाट, ता. अक्कलकुवा येथील रहिवासी आहे. त्याच्या गावापर्यंत वाहन देखील जात नाही. बालाघाट येथून एक कि.मी. अंतर पायी चालल्यानंतर तो राहत असलेल्या देवबारीपाडा ही वस्ती आहे. या वस्तीजवळच सातपुड्याचा भलामोठा डोंगर आहे. या डोंगरावर चढ-उताराच्या सवयीतून त्याला गिर्यारोहणाचे वेड निर्माण झाले. त्यातूनच त्याने आतापर्यंत महाराष्ट्रातील कळसूबाई, अजिंक्यतारा, गटेश्वर, हरिश्चंद्र गड आणि सातपुड्यातील अस्तंबा, चेन्नई येथील शिखर सर करण्यात यश मिळवले आहे. त्याची गुणवत्ता लक्षात घेत आंतरराष्ट्रीय कोच आनंद बनसोडे यांनी त्याची किलीमांजरोसाठी निवड केली. दक्षिण अफ्रिकेतील किलोमाजरोचे शिखर सर करण्याची सुरुवात २२ जानेवारी रोजी भारतीय पथक मोशीपासून केली जाणार आहे. अनिल विसावे हा आदिवासी समाजघटकातील कदाचित पहिला आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक ठरणार आहे.

**अशोकभाऊंच्या दातृत्वामुळे किलोमाजरो मोहीम होणार शक्य -अनिल वसावे**

किलोमाजरो हे आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर सर करण्याची संधी माझ्याकडे चालून आली आहे. मात्र घरातील प्रतिकुल परिस्थितीमुळे मी स्वतः खर्च करुन किलोमांजरो येथे जाऊ शकत नाही. ही संधी हातची निसटते की काय असे मला वाटत होते. अशा प्रसंगी एका वृत्तपत्रातील बातमी वाचल्यानंतर जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी पुढाकार घेत मदतीचा हात पुढे केला. केवळ आर्थिक पाठबळच नव्हे तर या मोहिमेसाठी लागणाऱ्या विविध बाबींची पूर्तता देखील अशोकभाऊ जैन यांनी पुरवण्याबाबत सांगितले. अशोकभाऊंसारख्या दातृत्ववान व्यक्तींमुळे माझे स्वप्न पूर्ण होण्यास मदत मिळणार असल्याचे अनिल वसावे याने म्हटले आहे.

**जैन स्पोर्टस् ॲकॅडमीतर्फे हिऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी मदत -अशोकभाऊ जैन**

भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाउंडेशन व जैन परिवारातर्फे सामाजिक बांधिलकी जोपासून जे काही उत्तम आणि उदात्त आहे त्याला सहकार्य केले जाते. जैन स्पोर्टस् ॲकॅडमीतर्फे क्रीडा क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून चांगले कार्य केले जात आहे. जैन ॲकॅडमीतर्फे चमकदार कामगिरी करणाऱ्या अशा हिऱ्यांचा शोध घेतला जातो व त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी आवर्जून मदत नक्कीच दिली जाते. जागतिक पातळीवर विक्रम नोंदवू पाहणारे गिर्यारोहक अनिल वसावेंच्या स्वप्नपूर्तीसाठी आम्ही मदतीचा हात पुढे केला असून त्यांची मोहीम यशस्वी होण्यास आम्ही शुभेच्छा देत आहोत.

# मका, ज्वारी आणि बाजरी खरेदीचा लक्षांक वाढल्याने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा!

**मुंबई/प्रतिनिधी**

किमान आधारभूत किंमत भरडधान्य योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२०-२१ साठी भारत सरकारने १५ लाख १८ हजार क्विंटल मका आणि २ लाख ५० हजार क्विंटल ज्वारी त्याचप्रमाणे ६० हजार क्विंटल पर्यंत बाजरी खरेदीसाठी राज्य सरकारला मान्यता दिल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

खरीप हंगाम २०२०-२१साठी किमान आधारभूत किंमत भरडधान्य योजनेअंतर्गत ४ लाख ४ हजार ९०० क्विंटल मका, ९ हजार ५०० क्विंटल बाजरी तर १५ हजार ४३६ क्विंटल ज्वारी खरेदीसाठी केंद्र शासनाने राज्य सरकारला मान्यता दिलेली होती. महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनमार्फत राज्यात १२२ व आदिवासी विकास महामंडळामार्फत ५२ खरेदी केंद्रांद्वारे भरडधान्य खरेदी सुरू करण्यात आली होती. मात्र राज्यात झालेल्या पीक पध्दतीतील बदलांमुळे राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मका आणि बाजरीचे उत्पादन घेतले आहे. त्यामुळे खरीप हंगाम २०२०-२१ साठी भारत सरकारने दिलेले ४ लाख ४ हजार ९०० क्विंटल मका आणि ९ हजार ५०० बाजरी खरेदीचे उद्दिष्ट्य दि. १४ डिसेंबर २०२० रोजी पूर्ण झाल्यामुळे १५ डिसेंबर २०२० पासून मका आणि बाजरीची खरेदी बंद झालेली होती. राज्यातील शेतकऱ्यांची मका, ज्वारी आणि बाजरीची खरेदी अजून बाकी राहिल्यामुळे १५ लाख क्विंटल मका, २ लाख ५० हजार क्विंटल ज्वारी आणि १ लक्ष ७ हजार क्विंटल बाजरी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्याची राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा विभागाने केंद्र सरकारकडे मागणी केलेली होती. राज्याचे अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी किमान आधारभूत किंमत भरडधान्य योजनेअंतर्गत मका आणि बाजरीचे उद्दिष्ट वाढवून देण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा केला होता. केंद्र सरकारने मका, ज्वारी आणि बाजरी खरेदीसाठी राज्याला उद्दिष्ट वाढवून दिल्यामुळे कोरडवाहू खरिपाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. भरड धान्य खरेदी ३१ जानेवारी २०२१पर्यंत सुरु राहणार आहे.

# भिवंडीच्या इंदिरा गांधी रुग्णालयाचा आरोग्यमंत्री टोपेंनी घेतला आढावा

**मुंबई/प्रतिनिधी**

भिवंडी येथील इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ तातडीने उपलब्ध करुन द्यावेत. रुग्णालयातील यंत्र सामुग्री दुरुस्त करुन रिक्त पदे त्वरित भरावीत अशा सूचना आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिल्या. मंत्रालयात भिवंडीच्या इंदिरा गांधी रुग्णालयाबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार रईस शेख, माजी आमदार रशिद ताहीरवाला, आरोग्य आयुक्त डॉ.रामास्वामी, भिवंडी-निजामपूर महापालिकेचे आयुक्त डॉ.पंकज आशिया, आरोग्य संचालक डॉ.अर्चना पाटील, डॉ.सतीश पवार, ठाणे आरोग्य उपसंचालक डॉ. गौरी राठोड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार आदी यावेळी उपस्थित होते. आरोग्यमंत्री राजेश टोपे म्हणाले, या रुग्णालयाच्या माध्यमातून गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळाले पाहिजे. या रुग्णालयात अतिरिक्त उपकरणे उपलब्ध करुन देतानाच यंत्र सामुग्रीची तातडीने दुरुस्ती करावी. रिक्त जागा भराव्यात. रुणालयामध्ये लवकरात लवकर स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध करुन द्यावेत. हे रुग्णालय नॉन कोविड करुन तेथे इतर रुग्णांना उपचार देण्याची व्यवस्था करावी, अशा सूचनाही राजेश टोपे यांनी यावेळी दिल्या.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता**

**पालघर पाटबंधारे विभाग, मनोर (पालघर) यांचे कार्यालय**

पत्ता : सूर्या प्रकल्प वसाहत, मनोर, ता.जि. पालघर - ४०१४०३, ई मेल पत्ता : eepidpalghar&gmail.com/ दूरध्वनी क्र. +९१ ८००७३३५३७३

**ई-निविदा सूचना क्रमांक ०३/ सन २०२०-२१**

**(द्वितीय मागणी)**

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| ३.२ | सुर्या उजवा तीर मुख्य कालव्यावरील पालघर शाखा क्र. २ वरील कोंकणसिंचन हंगाम सन २०२०-२१ सुरळीत पार पाडम्यासाठी वितरण प्रणालीच्या सिंचन व्यवस्थापनेचे अनुषंगिक कामे करणे. | पालघर | ९,४४,७५०/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १३/०१/२०२१ (दुपारी १२.०० वा.) ते दिनांक २२/०१/२०२१ (दुपारी ०३.०० वा.)
ई-निविदा उघडणे : दिनांक २५/१२/२०२० (दुपारी ०४.०० वा.)

**खालील संकेत स्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) http://wed.maharshtra.gov.in
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता.जि. पालघर यांचे कार्यालयीन सूचना फलक.

**जा.क्र. पापावि/लेशा-३/१२३/सन २०२१, दि. ११/०१/२०२१**
**कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय,**
**सूर्याप्रकल्प वसाहत, मनोर, ता.जि. पालघर**

**सही/-**
**(र. भा. पवार)**
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे विभाग, मनोर

18 JAN TO 24 JAN 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:32 PM Page 1



# मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांची बिंदगीहाळ येथील उमेद स्वयंसहायता गटाच्या सॅनेटरी नॅपकिन प्रकल्पास भेट

**लातूर/करकरे आंबादास**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा केंद्र व राज्य शासनाचा ग्रामीण भागातील गरिबी निर्मूलनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. याअंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये स्वयंसहायता गटाची मोठी चळवळ उभारण्यात आली आहे. स्वयंसहाय्यता गटाची बांधणी करून त्याचे ग्रामसंघ, प्रभाग महासंघ करून त्यांना बँकेचा पतपुरवठा उपलब्ध करून देणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे व उपजीविकेचे साधने निर्माण करणे तसेच बँकेचा पतपुरवठा होण्यास मदत करणे अशी महत्त्वपूर्ण कामे केली जातात. त्याच अनुषंगाने लातूर तालुक्यातील बिंदगीहाळ सारख्या ग्रामीण भागातील महिलांनी एकत्र येऊन स्वयंसहायता गटाची व ग्राम संघाची बांधणी करून घेतली व समाजाच्या अत्यंत संवेदनशील विषय व स्त्रीच्या आरोग्यविषयक बाब म्हणजेच मासिक पाळी या विषयास धरून सॅनिटरी नॅपकिन चा यशस्वी उद्योग चालू केला. या उद्योगास प्रोत्साहन व विपणन मार्गदर्शन करण्यासाठी लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी भेट देऊन प्रत्यक्ष प्रकल्पाची पाहणी केली व मार्गदर्शक सूचना देऊन प्रशासन पूर्णपणे पाठीशी असल्याची खात्री दिली. यावेळी प्रकल्प संचालक संतोष जोशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, गट विकास अधिकारी श्री गोडभरले व जिल्हा अभियान व्यवस्थापक देव कुमार कांबळे हे उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गोयल सॅनिटरी नॅपकिन या उद्योगाचे सर्व बारकावे समजून घेऊन महिलांनी केलेल्या हिम्मत तिचे मासिक पाळी सारख्या संवेदनशील विषयास अनुसरून चालू केलेल्या फ्लाय गर्ल सॅनिटरी नॅपकिन उद्योगाचे भरभरून कौतुक केले. तसेच नाविन्यपूर्ण योजनेतून अर्थसहाय्य करण्याचे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच सॅनिटरी नॅपकिन याचे विपणन करण्यासाठी विविध स्तरावर चर्चासत्र व व्यापाऱ्यांशी संवाद साधून जिल्हा विक्री केंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हंटले. मैत्री ग्राम संघाच्या अध्यक्षा व सॅनिटरी नॅपकिन उद्योगाच्या प्रवर्तक सौ ज्योती शिंदे यांनी प्रकल्पाची सुरुवात त्याचे प्रशिक्षण उद्योगाचे विविध टप्पे याची सविस्तर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व उपस्थितांना दिली. सौ. शिंदे यांनी फ्लाय गर्ल सॅनिटरी नॅपकिन च्या गुणवत्तेबाबत उपस्थितांना डेमो दाखवून क्वालिटीची हमी दिली. यादरम्यान कार्यक्रमाला उपस्थित संतोष जोशी यांनीसुद्धा महिलांना मार्गदर्शन करून मनोबल वाढवले. तसेच संतोष शिंदे व इतर मान्यवरांनी महिलांना मार्गदर्शन करून वेळोवेळी मदत करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला उपस्थित स्वयंसहाय्यता गटातील महिला, प्रेरिका सुलभा शिंदे, सरपंच, गावकरी यांनी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी गोयल साहेब यांचे मनापासून आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रभाग समन्वयक श्री त्र्यंबक गवळे, गणेश पाटील व जिल्हा विपणन व्यवस्थापक वैभव गुराळे उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीस गुजरात येथून पळवून आणलेल्या प्रियकरास भिवंडीत अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**

गुजरात राज्यातील भडोच शहरातून एका २३ वर्षीय आरोपीने अल्पवयीन मुलीला प्रेमाची फूस लावून अपहरण केल्याची घटना एक वर्ष पूर्वी घडली होती. याप्रकरणातील आरोपी तरुण हा पीडित मुलीसोबत भिवंडी तालुक्यातील ठाकुरपाडा, रांजणोली येथे राहत असल्याची खबर कोनगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक जिवन शेरखाने यांना लागताच त्यांनी या ठिकाणी पथकासह सापळा रचून आरोपी तरुणास ताब्यात घेऊन त्यास सोमवारी गुजरात पोलीसांच्या ताब्यात दिले. कुमार मंडल, (वय, २३) असे आरोपीचे नाव असून तो मूळचा बिहार राज्यातील रहिवाशी असल्याचे समोर आले आहे.

आरोपी कुमार मंडल हा गुजरातमधील अंकलेश्वर, भडोच शहरात मजुरीचे काम करीत होता. त्यावेळी १६ वर्षीय अल्पवयीन मुलीशी ओळख करून त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यांनतर डिसेबर २०१९ मध्ये तिचे अपहरण करून तिच्या सोबत भिवंडी तालुक्यातील ठाकुरपाडा,रांजणोली येथे एका खोलीत राहत होता. विशेष म्हणजे पीडितेच्या अपहरण प्रकरणी गुजरात राज्यातील अंकलेश्वर, भडोच येथील जी आय.डी.सी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा पीडितेच्या नातेवाईकांनी दाखल केला होता. तेव्हापासून हा आरोपी कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहत होता. तर दुसरीकडे गुप्त बातमीदाराने पोलीस उपनिरीक्षक जिवन शेरखाने यांना पीडित मुलीची माहिती मिळताच त्यांनी सदरची बाब वरीष्ठ पोलीस निरीक्षक गणपतराव पिंगळे सांगून पोलीस उपनिरीक्षक डी. एस. नांगरे, पोहवा, राजेंद्र धुमाळ, मपोशी सवीता नागपुरे, निलम सातवी, पोशि भागवत दहीफळे या पोलीस पथकाने पीडित मुलीला ठाकुरपाडा, रांजणोली येथुन ताब्यात घेवुन तीचेकडे पोलीस ठाणेस आणुन चौकशी केली असता तीने आरोपी अनील कुमार याने प्रेमाचे आमीष दाखवुन जबरदस्तीने पळवुन आणल्याचे सांगीतले. त्यावरून पोलीस पथकाने भडोच, गुजरात येथे चौकशी केली असता नमुद अनुषंगाने जी आय.डी.सी पोलीस ठाण्यात १६ डिसेंबर २०१९ रोजी भादवि कलम ३६३,३६६, सह पोक्सो कलम १२ अन्वये गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. तेव्हापासुन गुजरात पोलीस पीडित मुलीचा शोध घेत होते. आरोपी अनील यास पुढील कार्यवाहीकरीता कोनगाव पोलिसांनी गुजरात पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



# दोन वर्षापासून फरार असलेल्या मोक्कातील आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) गुन्हा दाखल असलेला दोन वर्षापासून फरार असलेल्या आरोपीस सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. सोलापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यातील फरार व पाहिजे असलेल्या आरोपींना जेरबंद करण्याबाबत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी विशेष पथक तयार केले होते. यामध्ये पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दरोड्यासह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा दाखल असलेला एक आरोपी मंज्या माणिक पवार (२७) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार झाला होता. सदरचा आरोपी हा चिंचगाव ता माढा जि. सोलापूर गावच्या शिवारातील वन विभागात आला असल्याचे माहिती पथकास मिळाली होती. पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून आरोपीस पकडले असून त्यास पुढील तपासासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपीविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात दरोडा व हत्यार अधिनियमासारखे गंभीर गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्यामध्ये देखील तो फरार असून त्यास विशेष पथकाकडून शिफातीने पकडण्यात आले आहे. पंढरपूर पोलीस ठाण्यात दाखल असलेला भाग ५- गुन्हा रजिनं २७२/२०२० भादंवि कलम ३९५/३९७/३४२ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (ळळ), ३ (२) , ३( ४) प्रमाणे गुन्हा हा २० /०५ / २०१९ रोजी दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास हा पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम करीत आहेत. ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम बुवा तसेच पोलीस हवालदार राजेश गायकवाड, विजय भरले, संभाजी खरटमल, पोलीस नाईक रवी माने, हरी पांढरे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड, अमोल जाधव, सचिन मागाडे, पांडुरंग काटे व महिला पोलीस हवालदार मंजुळा धोत्रे, सायबर शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल अन्वर अत्तार यांनी केली आहे.

पान १ वरून....

## प्रियकराचे प्रेम अखेर विश्वासघातकी...

निर्णय घेतला. दरम्यान घरातून पळून गेलेली अमिता वाणगाव येथे सुरज बरोबर वृंदावन सोसायटीत राहू लागली. तर तिचे घरचे लोक मात्र तिची शोधाशोध करीत होते. तर तिकडे अमिताने प्रियकराच्या मागे लग्नाचा ससेमिरा लावताच त्याने तिला ठार मारून तो राहत असलेल्या फ्लॅटच्या भिंतीत पुरले आणि अमिताच्या सोशल मिडियावरील अकाऊंटवरून तिच्या नावाने स्वतःच तिच्या मैत्रिणींशी आणि घरच्यांशी चॅटिंग करीत होता. त्यामुळे आपली मुलगी सुरज बरोबर सुखरूप आहे असे तिच्या घरच्यांना वाटत होते आणि सुरज सुद्धा निर्धास्त होता. पण पाप किती जरी लपवण्याचा प्रयत्न केला तरी ते लपत नाही. कधीना कधी त्याला वाचा फुटतेच. तब्बल चार महिने सुरजने हे नाटक उत्तमरीत्या वठवले. पण नंतर अमिताच्या घरच्यांना संशय आल्याने त्यांनी बोईसर पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची मिसिंगची फिर्याद नोंदवली. अमिता सुरज बरोबर पळून गेलेली असल्याने पोलिसांनी सुरजला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पण चौकशीत त्याने जे काही सांगितले त्याने पोलिसांच्या पायाखालची जमीन सरकली. सुरजने सांगितले कि अमिताने लग्नाचा तगदा लावल्याने आपण तिला ठार मारून भिंतीत पुरले. त्यानंतर पोलिसांनी सूरजच्या वाणगाव येथील वृंदावन सोसायटीतल्या घराची भिंत खोडून अमितचा सडलेला अस्थिपंजर मृतदेह बाहेर काढला. आश्चर्याची बाब म्हणजे अमिताला भिंतीत पुरून तो त्याच घरात बिनधास्त राहत होता आणि तिच्या अकाऊंटवरून चॅटिंग करून ती जिवंत असल्याचे भासवीत होता. पण शेवटी त्याच्या पापाचा घडा भरला. या प्रकरणी वाणगाव पोलिसांनी त्याच्यावर हत्या आणि पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## साताऱ्यात ज्येष्ठ अभिनेत्रीचा खून ...

त्यांच्या हत्येमुळे मोठी खळबळ माजली आहे. जया यांनी त्यांच्या बंगल्यातील काही जागेत भाडेकरू ठेवले होते. त्यामुळे पोलीस आता त्यांच्याकडून माहिती घेत आहेत. मात्र जयाच्या हत्येचे गुड अजून तरी उलगडलेले नाही.

## दारूची पार्सल महागात पडली...

समोरील वडाच्या झाडाखाली तीन तरुणांसोबत शाब्दिक बाचाबाची झाली. त्यातून समीर आणि तिन्ही तरुणांमध्ये मारामारी झाली. यात त्याचा मित्र आदिल सुद्धा मदतीला धावून आला होता. या धुमश्चक्रीत समीरवर धारदार शस्त्राने वार करण्यात आला. चाकू थेट मांडीत घुसला. या हल्लूयात त्यांच्या गुप्तांगाजवळ खोलपर्यंत जखम झाली आणि तो जागेवर कोसळला. त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु, डॉक्टरांनी त्याला मृत म्हणून घोषित केले. हत्या झालेल्या समीरवर या पूर्वी विनयभंग, अपहरण, हाणामारी सारखे गुन्हे दाखल होते. समीर हा गांजा विक्री करत होता. तर ताब्यात घेण्यात आलेला जो आरोपी आहे त्यावर देखील यापूर्वी गुन्हे दाखल आहेत. मृत आणि मारेकरी एकमेकांच्या ओळखीचे नसल्याने क्षुल्लक कारणावरून झालेल्या या हत्येमुळे चर्चेला उधाण आले आहे. सीसीटीव्ही तपासणी दरम्यान हे तिघेही घटनस्थळाच्या काही अंतरावर दिसून आले होते. मृतासोबत असलेला त्याचा मित्र मोहम्मद आदिलने ओळखल्याने पोलिसांनी मध्यरात्री तिघांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही हत्या किरकोळ कारणावरून झाली की मग या मागे दुसरे काही कारण आहे, याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## डहाणूमध्ये लुटारू उद्दाम झाले...

मोलकरनी शुक्रवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास त्यांच्या घरी गेल्या. तेव्हा हा प्रकार समोर आला. त्यांनी ही माहिती जवळच असलेल्या रिक्षा स्टँडवर डहाणू रिक्षा चालक मालक युनियन संघटनेचे अध्यक्ष जयदेव पांडुरंग मर्द यांना दिली. यानंतर मर्द यांनी डहाणू पोलिसांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर पीएसआय कांबळी यांसह पोलीसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेनंतर शहरात एकच खळबळ उडाली असून पोलिस अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, हत्या नेमकी कोणी केली याचा पोलीस शोध घेत असून परिसरात चौकशी सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी घटनास्थळावरून पोंदा यांचा मृतदेह ताब्यात घेतला असून तो शवविच्छेदनासाठी नजिकच्या स्थानिक रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. तर आरोपीचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्हीदेखील तपासण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## ५० हजारांची खंडणी नाही दिली...

नसताना अथक प्रयत्नानंतर ३ दिवसातच महिलेवर गोळीबार करणाऱ्या आरोपीचा शोध लावण्यात यश आले. धक्कादायक बाब म्हणजे ब्लॅकमेलिंगच्या प्रकारातून ५० हजार रुपये मागणीच्या वादातून आरोपीने घरात घुसून गोळीबार केल्याचे पोलीस तपासात समोर आले. सुरेंद्र प्रतापसिंह भाटी (वय २४, रा.धार, मध्यप्रदेश) आणि मानसिंग उर्फ बंटी सदन चौहाण (वय २०) असे आरोपीचे नावे असून या दोघांनाही मध्यप्रदेशमधील धार शहरातुन ताब्यात घेवुन अटक केली आहे. तर जयश्री देडे (वय ३६) असे जखमी महिलेचे नाव असून तिच्यावर अध्यापही अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

जखमी जयश्री हि काल्हेर मधील जय दुर्गा सोसायटीमध्ये आपल्या परिवारासह राहत आहेत. तिच्या पतीचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय असून ती देखील पतीचा ट्रान्सपोर्ट व्यावसाय सांभाळत असल्याने यातील आरोपी सुरेंद्र भाटी हाही भिवंडीत ट्रान्सपोर्टमध्ये काम करीत असताना जयश्री यांचे पती शिवराम देडे यांचे सोबत त्याची ओळख होती. याच ओळखीचा फायदा घेऊन जयश्रीला खोटी बदनामी करण्याच्या नावाने धमकी देत, तिला ब्लॅकमेल करून ५० हजार रुपयांची मागणी आरोपी करीत होता. मात्र ती त्याला ५० हजार देण्यास नकार देत होती. मात्र त्याला पैश्याची गरज असल्याने त्याने साथीदार मानसिंग उर्फ बंटी चौहाण याचेशी आपसात संगणमत गोळीबार केल्याचे समोर आले आहे. आरोपी भाटी आणि बंटी १२ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास त्या महिलेच्या घरात घुसुन देशी बनावटीचे पिस्टलचा धाक दाखवून पैशाची मागणी करीत होते. मात्र महिले नकार देऊन आरडाओरडा केल्याने आरोपी सुरेंद्र भाटी याने महिलेच्या डोक्यामध्ये गोळी मारून गंभीर जखमी केले. त्यावेळी महिलेचा मुलगा व शेजारी राहणार चेतन पवार मदतीसाठी आले असता, आरोपीने त्यांच्या दिशेनेही गोळीबार करून फरार झाले होते. खळबळजनक बाब म्हणजे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन मुख्य आरोपी भाटी याचेवर मध्यप्रदेश येथे राजगड पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे, असे सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे किसन गवळी यांनी सांगितले.

पान ८ वरून....

## प्रशासनाच्या गलथान कारभाराच्या...

करून कारवाई करण्याचे आश्वासन माजी मंत्री विनायकराव पाटील व उपस्थितांना दिल्यानंतर ठिय्या आंदोलन उठवण्यात आले. सदरील ठिय्या आंदोलनात माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्यासह सय्यद साजीद भाई, राम बेल्लाळे, देवानंद मुळे, लक्ष्मीकांत कासनाळे, गोविंद गिरी, राजकुमार खंदाडे, अमित रेड्डी, चंद्रकांत गंगथडे, राहुल शिवपुजे, निखिल कासनाळे, किशोर कोरे, प्रशांत जाभाडे, अमोल इरले, श्रीकांत शर्मा, जगन्नाथ मामडगे, आसिफ पठाण यांच्या सह पंचायत समिती सदस्य राम नरवटे, माणीक नरवटे व शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## बाभळगाव येथे आधुनिक यंत्राव्दारे...

केल्यास शेतकऱ्यांना किफायतशीर दरात ऊस लागवड करता येते, वेळेत, खर्चात बचत होते, एकरी उत्पादकता वाढण्यास मदत होते. शंभर टक्के रोप उगवण क्षमता ठेवण्यासाठी, नियोजित आंतरावर रोपाची लागवड व सरीतील योग्य आंतर ठेऊन आणि कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त क्षेत्रावर लागवड करून एकरी उत्पादकता वाढीसाठी सभासद व ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी यंत्राव्दारे ऊस रोप लागवड करावी, तसेच या माध्यमातून शेतकरी आणि बेरोजगार युवकांना रोजागारनिर्मीती आणि व्यवसायीक संधी निर्माण होणार आहेत. येणाऱ्या काळाची पाऊले ओळखुन सभासद व ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी यंत्राव्दारे ऊसरोप लागवड करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

महिद्रा ॲन्ड महिद्रा कंपनीचे ऊसरोप लागवड यंत्राचे प्रात्याक्षिक कंपनीचे क्षेत्रीय अधिकारी स्वप्नील माईनकर यांनी दाखवुन प्रात्यक्षिकासह माहिती दिली. यावेळी ते म्हणाले, यंत्राव्दारे ऊसरोप लागवड करण्यासाठी एकरी ३ ते ४ तास लागतात यामुळे वेळेत बचत होवुन लवकर ऊस लागवड होते. एकरी साधरनता १ हजार ५०० रूपये खर्च येतो यातुन मनुष्यबळ वाचून खर्च कमी होते. इटालीयन तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्र बनवले आहे. ऊसरोपाची लागवड करीत असतांना स्वयचलीत यंत्राव्दारे ऊसाचे योग्य आंतर ठेऊन लागवड आणि सरी पाडली जाते. यामुळे ऊगवण क्षमता जास्त असुन ऊसउत्पादकांना एकरी ऊसाचा ऊतारा जास्त मिळतो. अशा प्रकारच्या इटालीयन तंत्रज्ञानाचा भारतात प्रथमच वापर होत आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सर्वश्री कारखान्याचे व्हा.चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक जे.एस.मोहिते, संचालक अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, नारायण पाटील, अमर मोरे, अनिल पाटील, गोविंद डूरे, सूर्यकांत सुडे, अमृत जाधव, कुसुमताई कदम, सुभाष माने, दगडूसाहेब पडीले, भैरवनाथ सवासे, माजी संचालक रामचंद्र सुडे, मुख्यशेतकी अधिकारी कल्याणकर, ऊसविकास अधिकारी कदम, जहागिरदार यांच्यासह कारखाना सभासद, शेतकरी, ऊस तोडणी ठेकेदार, कामगार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर आभार व्हा.चेअरमन रविद्र काळे यांनी मानले.

## जनवादी महिला संघटनेच्या वतीने...

कामे चालू करा, पंतप्रधान आवास घरकूल योजनेची 'ड' यादीला पुरवणी यादी जोडून तात्काळ चालू करा तसेच घरकुलाचे शेवटचे हप्ते तात्काळ, अदा करा, तालुक्याची सर्व प्रतिमाणसी १० किलो धान्य देऊन जुने रेशनकार्ड व नवीन रेशनकार्डवर तात्काळ काढून धान्य चालू करा, कुपोषीत मुलांना योग्य तो आहार मिळाला पाहिजे, भरमसाट आकारण्यात आलेले विजेची बिले तात्काळ कमीकरा, तसेच यापुढे जास्त आकारणे बंद करा, तालुक्याती मोडकळीस आलेल्या अंगणवाड्या त्वरीत दुरुस्त कराव्यात, आबिटघर पेपर मिलच्या दुषीत पाण्याने झालेल्या शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई मिळाली पाहीजे, अंभई गावची छेडा कंपनीच्या दुषीतपाण्यामुळे शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरपाई मिळाली पाहीजे व खराब विहिरींचे नियोजन करा अशा विविध मागण्यांसाठी तालुक्यातील शेकडो महिलांनी तहसील कार्यालयाला घेराव घातला होता. तालुका अध्यक्ष कॉ.रमा तारावी व तालुका सचिव कॉ. आरती डावरे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शेकडो महिला मोर्च्यात सहभागी झाल्या होत्या.

## जिजाऊंच्या संस्कारांमुळे छत्रपती...

मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण हे ३१ टक्के आहे. हे प्रमाण वाढण्याची गरज आहे. मुलांप्रमाणे मुलींनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे. आपण शिक्षणाच्या गाडीची ही दोन्ही चाके मजबूत करण्याचा राष्ट्रमाता माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी संकल्प करू, अशी शपथ प्राचार्य केंद्रे यांनी उपस्थित शिक्षकांना दिली. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यातील पाटोळे परिवाराने ...

बळीचं राज्य येऊ दे असा घोष करण्यात येत असतो. या पुजेसाठी उघड्यावरच ज्योत पेटवली जाते. स्वत: बळीराजा ही पूजा करत असतो. पूजा झाल्यानंतर आग्रहाने निमंत्रित केलेल्या मित्र, पाहून्यांच्या जेवणाच्या पंगती बसतात. त्यामुळे तालुक्यातील शेतशिवार माणसाने फुलून दिसत असतो. वेळ अमावस्या निमित्त शेतकरी आपल्या कुटुंबासह मित्र परिवार यांच्यासोबत वनभोजनाचा आस्वाद घेत असतात. वेळ अमावस्या मुळे लातूर शहरासह तालुक्यात अघोषित संचारबंदी झाली असल्याचीच परिस्थिती होती.दरम्यान मुळ कर्नाटक राज्यातील असणारा वेळ अमावास्या हा सण महाराष्ट्रातील लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यासोबत शेजारील तालुक्यांमध्ये मार्गशीर्ष अमावस्या म्हणजेच वेळ अमावस्या मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. ही आमावस्या दर्शवेळा अमावस्या म्हणूनही ओळखली जाते. मूळ कानडी शब्द येळ्ळ अमावस्या म्हणजे पेरणीनंतर येणारी सातवी अमावस्या म्हणजे येळअमावस्या, याचाच अपभ्रंश होऊन वेळ अमावस्या शब्द रुढ झाला. शहरी भागातील लोकांसाठी तर हा सण म्हणजे पर्वणी असतो. त्यामुळे या दिवशी सर्व जण आवर्जून येतात. व या सणाचा आनंद घेतात.

औसा तालुक्यातील तावशी ताड येथील शेतकरी चंद्रकांत पाटोळे, धनराज पाटोळे यांच्या शेतात मोठ्या उत्साहात काळ्या आईची सहकुटुंब पुजा करण्यात आली. यावेळी भामाबाई पाटोळे, कांचन पाटोळे, स्मिता पाटील, शिवकन्या पाटोळे, संतोष आस्वार, राम पाटोळे, हारीओम पाटोळे उपस्थित होते. तसेच अहमदपूर तालुक्यातील सुनेगाव (शेंद्री) येथील शेतकरी शिवाजी काळे यांच्या शेतात काळ्या आईची सहकुटुंब पुजा करण्यात आली. यावेळी शेतकरी बालाजी काळे, आशा काळे, कमल काळे, जना काळे, धनश्री काळे, प्रगती काळे, प्रज्ञा काळे,गोविंद काळे, गोपाळ काळे, प्रणव काळे, पायल काळे, प्रगती काळे, प्रतीक काळे, पियुष काळे, आयुष काळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

18 JAN TO 24 JAN 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 16/01/2021 9:35 PM Page 1



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ७३ फिरत्या पशुचिकित्सालयांचे लोकार्पण पशू आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा -उद्धव ठाकरे




**मुंबई/प्रतिनिधी**

आयुष्यभर आपण ज्यांच्या जीवावर जगतो त्या शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या जपणुकीसाठी पशू आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पशुसंवर्धन विभागास दिले. ७३ फिरत्या पशुचिकित्सालयांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व पशुसंवर्धन मंत्री श्री सुनिल केदार यांच्या हस्ते वर्षा या शासकीय निवास्थानी फिरत्या पशुचिकित्सालयाला हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण करण्यात आले. ही ७३ फिरती पशुचिकित्सालये राज्याच्या दुर्गम भागातील तालुक्यांमध्ये जिथे पशुवैद्यकीय सुविधा जवळपास उपलब्ध नाही अशा ठिकाणी कार्यान्वित झाली आहेत. यावेळी पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार, मुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिव विकास खारगे यांच्यासह पुण्याहून पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या अभियानात आपल्या माणसांबरोबर आपल्या पशुधनाचाही समावेश आहे. त्यामुळेच पशुचिकित्सेसारख्या महत्वाच्या विषयावरही शासनाने लक्ष केंद्रीत केले आहे.

**१९६२ हा टोल फ्री नंबर गावागावात पोहोचवा!**

पशुधन आजारी असल्याचे शेतकऱ्यांना कळते परंतु यापुढे काय करायचे, कुठे आणि कसे जायचे हा त्यांच्यापुढचा प्रश्न असतो. त्यामुळे १९६२ हा फिरत्या पशुचिकित्सालयांसाठी जो टोल फ्री क्रमांक आहे त्याची माहिती गावागावात पोहोचवावी, जनजागृती करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना या चिकित्सालयासंबंधीची माहिती मिळून ते त्याचा लाभ घेऊ शकतील. ही केवळ ॲम्ब्यूलंस नाही तर चिकित्सालय आहे, यात उपचाराची, कृत्रिम रेतनाची सोय आहे. आवश्यकतेनुसार पशुधनाला या वाहनातून उपचारासाठी इतरत्र हलवताही येणार आहे. ही माहितीही पशुपालकांपर्यंत पोहोचवावी, या माध्यमातून नित्य नवे प्रयोग हाती घ्यावे. या फिरत्या पशुचिकत्सालयामध्ये काम करणाऱ्या पशुवैद्यकांनी आणि वाहनचालकाने संवदेनशील राहून काम करावे असेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी सांगितले. पशुसंवर्धन मंत्री सुनिल केदार म्हणाले की, मुख्यमंत्री पशु स्वास्थ्य योजनेअंतर्गत पशुपालकांना त्याच्या पशुधनाची काळजी घेण्यासाठी फिरते चिकित्सालय घरी येऊन सेवा देणार आहेत यामुळे त्यांचा वेळ,पैसा वाचणार आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था पशुपालन, कुक्कुटपालन यावर अवलंबून आहे. यासाठी ग्रामीण भागातील लहानातील लहान घटकाला मुख्यमंत्री पशु स्वास्थ्य योजनेअंतर्गत सेवा देण्यात येणार आहे .

अद्ययावत कॉल सेन्टर उघडण्यासाठी इंडसइंड बँकेची उप कंपनी भारत फायनान्स इनक्लूजन लि. सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. भारत फायनांस इन्क्लुजन लिमिटेड या कंपनीद्वारे पशुसंवर्धन विभागाबरोबर सामंजस्य करार करुन त्यांच्या सीएसआर फंडातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून या सेंटरची कामे करण्यात येणार आहेत. भारत फायनांस इन्क्लुजन लिमिटेड ही कंपनी कॉल सेंटर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक संगणक, विशेष सॉफ्टवेअर आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ पुरविणार असून पशुसंवर्धन विभाग, यांचे मार्फत औषधी व उपकरणांनी सुसज्ज फिरते पशुचिकित्सा वाहन, वाहन चालक व तज्ञ पशुवैद्यक उपलब्ध करून देणार आहे असे केदार यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री पशु स्वास्थ्य योजना कशी राबविण्यात येणार याविषयीची चित्रफीत दाखविण्यात आली. पशुसंवर्धन राज्यमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. पशुसंवर्धन विभागचे प्रधान सचिव अनुपकुमार यांनी प्रास्ताविक केले तर डॉ.केंडे यानी सुत्रसंचलन केले.

# विविध मागण्यांसाठी कामगारांचा तहसील कार्यालयावर धडक मोर्चा



**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील मुसारने फाटा येथील हॉरबिगर कंपनीतील १०६ कामगारांना कामावरून कमी केल्या बद्दल अखिल महाराष्ट्र जनरल कामगार युनियनच्या वतीने गुरुवारी (दि.१४) तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. मागण्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात आलेल्या व कायदेशीरपणे कामावरून काढुन टाकण्यात आलेल्या सर्व १०६ कामगारांना सेवेत पुनः रुजू करून घेण्यात यावे, कंपनी व लेबर कॉन्ट्रॅक्टर यांच्यातील कंत्राट बोगस ठरवण्यात येऊन ते रद्द करण्यात यावे, तसेच परिशिष्ट 'अ' मधील सर्व कामगारांना कंपनीच्या सेवेत कायम कामगार म्हणून सामावून घेण्यात यावे, २६ मार्च २०२० या दिवसापासून म्हणजे ज्या दिवसापासून कामगारांना बेकायदेशीर कामावरून काढण्यात आले ते ज्या दिवशी त्यांना कामावर घेतले जाईल त्या दिवसापर्यंतचा सर्व थकित पगार १८% चक्रवाढ व्याजाने देण्यात यावा तसेच सेवेची निरंतरता व इतर फायदे परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात भालेल्या कामगारांना देण्यात यावेत. वर्ष २०१९-२०२० या काळातील बोनस या कामगारांना अदा करण्यात आलेला नाही. तोही तात्काळ अदा करण्यात यावा, या मागण्यांसाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याचे युनियनचे तालुका संघटक कपिल पाटील यांनी सांगितले.

क्राईम Reporter
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, सांगली आणि नवी मुंबई, पनवेल येथील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा
9890718873

# अहमदपुरच्या मटकाकिंगचा देवणी शहरात बस्तान!

**देवणी/प्रतिनिधी**

लातुरचे तात्कालीन पोलिस अधिक्षक राजेंद्र माने असताना लातुर जिल्ह्यात अवैद्य धंदेवाल्यानी नंगा नाच चालु केला होता! हप्तेखोर पोलीस प्रशासनाच्या मुक सहमतीने अवैद्य धंदेवाल्यांची मोठ्या प्रमाणात दादागीरी हि वाढली होती, जिल्ह्यातील जनता एक प्रकारे दहशतीत वागत होते, अवैद्य धंदेवाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात चढाओढ निर्माण झाली होती पैशाच्या लालसेपोटी पोलीस प्रशासनाने एक एका गावात दोन दोन मटकाकिंगला हाप्ता घेऊन परवानगी देऊन टाकली होती आणि या अवैद्य धंद्याच्या चढाओढीतुन मटकेवाल्यां मध्येच कुरबुऱ्या वाढल्या होत्या एखादी दुर्देवी घटना घडायलाहि वेळ लागत नव्हता. परंतु देव बल्वतर या म्हणी प्रमाणे नुतन कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांनी लातुर जिल्याचा पदभार स्विकारताच जिल्ह्यातील सर्वच अवैद्य धंदेवाल्याना चपराक बसली आहे हे मात्र नक्की!

कर्तव्यदक्ष पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांनी कांही दिवसापुर्वी उदगीर शहराला भेट देली होती व एक पत्रकार परीषेद घेऊन यापुढे जिल्ह्यात एक पण अवैद्य धंदे चालू देणार नाही असे जाहिरपणे उदगीर येथील पत्रकार परीषदेत सांगितले होते व तशा प्रकारच्या विविध वृत्तपत्रात बातम्या हि प्रसिद्ध झाल्या तसे त्यांनी जिल्ह्यातील अवैद्य धंदे बंद करून हि दाखविले आहे, परंतु देवणीच्या लाचखोर पोलीस प्रशासनाकडुन अहमदपुरच्या (राणी सावरगाव) मटकाकिंगला देवणीत बोलावुन घेऊन चिरीमिरीचा व्यवहार करून देवणी शहरातील एका लाजवर त्याचे बस्तान बसविले आहे हा मटकाकिंग सोमवार ते शनिवार पर्यत रात्री देवणी शहरातील लाजवर व दिवसा बस स्थानका समोरील एका अड्ड्यावर बसुण राहतो व मटक्याचा सर्व कारभार मोबाईल वाटसप दवारे संभाळत आहे. शहरातील गल्ली बोळात लपुन छपुन मटका घेणाऱ्या एजंटाची संख्या वाढल्याने तरुण वर्ग पुन्हा मटक्याच्या आहरी गेल्याने त्यांचा संसार पुन्हा उघड्यावर आला आहे. पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांनी अवैद्य धंदे बंद करण्याचा आदेश देऊन देखील स्थानिक पोलिस प्रशासन जर कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत असेल, चिरीमिरीचा व्यवहार करून मटकाकिंगला लपुन छपुन धंदा करण्याचे आदेश देत असतील तर यापेक्षा दुर्देव काय असे म्हणावे लागेल अशा प्रशासनातील अधिकाऱ्यांना कृतव्यदक्ष पोलीस अधिक्षक निखील पिंगळे साहेबांनी सरळ कंट्रोल रुमची हवा दाखवावी, अशी चर्चा सध्या देवणी शहरातील चौका चौकात चालू आहे. या सर्व प्रकरणाकडे आता स्वतः पोलीस अधिक्षक निखील पिंगळे यांनी लक्ष देऊन या करीता विशेष पथक नेमुन देवणी शहरातील अवैद्य चालणारा मुंबई कल्याण नावाचा मटका बंद करावे अशी मागणी जनतेतुन होत आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू



वाडा : रात्रीच्या सुमारास दुचाकीवरून घराच्या दिशेने जात असणाऱ्या दोघा तरुणांना अज्ञात वाहनाने धडक दिली असता यातील चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे तर दुसऱ्याला किरकोळ दुखापत झाली आहे. शुक्रवारी (दि.८) रात्रीच्या सुमारास रोहन मारवत घाटाळ (वय२२) रा. हरोसाळे येथील घराकडे दीपक मुकणे याच्या सोबत दुचाकीवरून येत असताना सासणेफाटा येथे एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने रोहनचा जागीच मृत्यू झाला आहे तर दीपक मुकणेला किरकोळ दुखापत झाल्याने त्याच्यावर वाडा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून घरी पाठविण्यात आले आहे.

### जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन

# महिला आणि बालकांच्या विकासासाठी नाविण्यपूर्ण कल्पनांची अंमलबजावणी करा-ॲड.यशोमती ठाकूर




**मुंबई/प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी महिला आणि बालकांचा विकास आणि संरक्षणाच्या बाबींमध्ये नाविण्यपूर्ण कल्पनांची अंमलबजावणी करत 'सक्षम महिला, सुदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्र' घडवण्यात मोलाचा सहभागा नोंदवावा, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले. आगामी वर्षभरात राज्यातील सर्व अंगणवाड्यांची स्वत:ची इमारत, नळजोड, वीजजोड, स्वच्छतागृह असतील हे लक्ष्य ठेऊन ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. महिला व बालविकास विभाग, ग्रामविकास विभाग आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची दोन दिवसीय राज्यस्तरीय अभिसरण आणि आढावा परिषद सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ॲड. ठाकूर बोलत होत्या. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव संजय चहांदे, महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती इद्झेस कुंदन, जल जीवन मिशनच्या प्रकल्प संचालक श्रीमती आर. विमला, एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त श्रीमती इंद्रा मालो, युनिसेफच्या आहार तज्ज्ञ डॉ. अपर्णा देशपांडे आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यावेळी म्हणाल्या की, कोविड-१९ महामारीच्या आव्हानात्मक कालावधीमध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीसांनी खूप काम केले. अंगणवाड्या बंद असल्यामुळे बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रीयांना पोषण आहाराचा शिधा घरोघरी पोहोचवत कुपोषण निर्मुलनासाठी कष्ट घेतले. 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या मोहिमेतही त्यांनी मोलाचे योगदान दिले असून त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे, असेही ॲड. ठाकूर म्हणाल्या.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी महिला व बालकांचा विषय प्राधान्यक्रमावर घेऊन त्याप्रमाणे योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करावी. महिलांचे सक्षमीकरण आणि बालकांचा सर्वागीण विकास समोर ठेऊन नाविन्यपूर्ण संकल्पना कृतीत आणाव्यात. जिल्हानिहाय या क्षेत्रात असलेली आव्हाने वेगवेगळी आहेत. त्यावर योग्य पद्धतीने उपाययोजना कराव्यात. कोविड कालावधीमध्ये बालविवाहांची समस्या तिव्रतेने समोर आली. ते रोखण्यासाठी विभागानेही चांगले प्रयत्न केले. तथापी, कुपोषण, बालविवाह निर्मुलनासाठी खूप काम करणे आवश्यक आहे. रोखलेले बालविवाह पुन: होऊ नयेत यासाठी प्रत्येक प्रकरणावर लक्ष ठेवावे, असेही, ॲड. ठाकूर म्हणाल्या. सुदृढ बालक बरोबरच सुरक्षित बालक ही देखील खूप महत्त्वाची बाब असून त्यासाठी प्रत्येक गावातील ग्राम बाल विकास समित्या (व्हीसीडीसी) आणि ग्राम बाल संरक्षण समित्या (व्हीसीपीसी) सक्षम करणे आवश्यक आहे, यावरही महिला व बालविकास मंत्र्यांनी भर दिला. प्रधान सचिव श्रीमती कुंदन म्हणाल्या की, कोरोनाच्या आव्हानात्मक परिस्थितीत अंगणवाडी पातळीवर चांगले काम झाले आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या (एनएफएचएस-५) निष्कर्षात बालकांची वयाच्या मानाने कमी उंची (स्टंटिंग) आणि कमी वजन (वेस्टेड) या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्याला सर्व बालके, स्तनदा माता, गर्भवती स्त्रीया या लाभार्थी घटकांपर्यत पोहोचणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व अंगणवाड्यांचे जिओ- टॅगिंग करण्यात आले असून अंगणवाड्यांचे पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्यासाठी त्याचा चांगला उपयोग करावा. महिलांना सक्षम केल्यास कुपोषण निर्मुलनात त्या महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. राष्ट्रीय पाळणाघर योजना ही अर्थार्जनासाठी घराबाहेर पडू इच्छिणाऱ्या महिलांसाठी महत्त्वपूर्ण आहे. जिल्हा परिषदांनी या योजनेसाठी पुढे आल्यास बालकांना पाळणाघरात ठेऊन महिला अर्थाजनासाठी बाहेर पडू शकतील. त्यातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकेल. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विविध विभागांमध्ये समन्वय आणि अभिसरणासाठी प्रयत्न करावेत. अंगणवाडी सेविका, आशा आणि एएनएम कार्यकर्ती या तिन्ही घटकांनी समन्वयाने काम केल्यास आरोग्याबाबतच्या मूलभूत निर्देशांकात सकारात्मक सुधारणा होईल, असेही त्या म्हणाल्या. यावेळी एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त श्रीमती मालो यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. अपर्णा देशपांडे यांनीही मनोगत व्यक्त केले. अंगणवाड्यासाठींच्या आकार अभ्यासक्रमाबाबतच्या पुस्तिकेचे प्रकाशन तसेच अंगणवाडी सेविकांसाठीच्या एलआयसी विमा योजनेच्या लाभासाठी तयार केलेल्या ऑनलाईन यंत्रणेचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

# निरीक्षणगृह व विशेष दत्तक संस्थेसाठी इच्छुक सामाजिक संस्थेने प्रस्ताव सादर करावेत

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा हा नवनिर्मित जिल्हा असल्यामुळे जिल्ह्यात निरीक्षणगृह व विशेष दत्तक संस्था अद्याप स्थापन नाही. निरीक्षणगृह व विशेष दत्तक संस्थेसाठी इच्छुक सामाजिक संस्थेने (NGO) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४७ नुसार निरीक्षणगृह नोंदणीकृत असणे आवश्यक आहे व कलम ६५ नुसार विशेष दत्तक संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे इच्छुक सामाजिक संस्थेने निरीक्षणगृह व विशेष दत्तक संस्थासाठी बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ च्या नियम २०१८ च्या नमुना नं.२७ प्रमाणित परिपुर्ण प्रस्तावासह जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंडच्या शेजारी, विष्णु नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर (प). पिनकोड-४०१ ४०४ या कार्यालयास दोन प्रतीसह प्रस्ताव सादर करण्यात यावे अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी दिली.

# 'बर्ड फ्लू'संदर्भात अफवा व चुकीची माहिती पसरू नये; प्रशासनाने नागरिकांना योग्य व वस्तुनिष्ठ माहिती द्यावी!

**मुंबई/प्रतिनिधी**

बर्ड फ्लूसंदर्भात अफवा व चुकीची माहिती पसरू नये यासाठी प्रशासनाने नागरिकांना योग्य व वस्तुनिष्ठ माहिती द्यावी. माणसांमध्ये या रोगाचे संक्रमण होत नसल्याने घाबरण्याचे कारण नसल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. बर्ड फ्लू संदर्भात राज्यातील परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा निवासस्थान येथील समिती सभागृहात घेतला. यावेळी पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, अतिरिक्त मुख्य सचिव सीताराम कुंटे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे उपास्थित होते.

ठाकरे यांनी बर्ड फ्लू संदर्भात आढावा घेवून नंतर लगेचच राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे बर्ड फ्लू संक्रमण आणि घ्यावयाची काळजी या संदर्भात निर्देश दिले. या संदर्भातील निर्देशांची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. या रोगाचे तात्काळ निदान होण्याकरीता राज्यामध्ये पशुसंवर्धन विभागासाठी जैवसुरक्षास्तर ३ ही अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

ज्या भागात बर्डफ्लू रोगाची लागण नाही अशा भागात अंडी व मांस ७० डीग्री पेक्षा जास्त तापमानात शिजवून खाल्ल्यास काहीही धोका नसल्याचे नमूद करून याबाबत गैरसमज व अफवा पसरविण्यात येवू नयेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले की, परभणीत ८४३ कोंबड्या, ठाण्यात बगळे व इतर पक्षी मिळून १५, रत्नागिरीत ९ कावळे यांचे बर्ड फ्लू अहवाल एच५एन१ व बीड येथील ११ कावळ्यांचा अहवाल एच५एन८ असा आला आहे. उर्वरित ठिकाणचे अहवाल भोपळहून प्राप्त व्हायचे आहेत. पशुसंवर्धन विभागाने बर्ड फ्लू मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पाठविल्या आहेत. केंद्र शासनाच्या उपाययोजनांच्या कृती आराखड्याप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे या सूचनांची गांभीर्याने अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. ७ जानेवारीपासून कंट्रोल रूम स्थापित केले असून मृत पक्षांची माहिती घेणे सुरू आहे. पक्षांचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात यावे अशाही सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

# शेतकरी योजनेतील शिधापत्रिका लाभार्थ्यांनी मोबाईल क्रमांक आणि आधार सिडींग करावे!

**पालघर/प्रतिनिधी**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व एपीएल (केशरी) शेतकरी योजनेतील शिधापत्रिकेतील सर्व लाभार्थ्याचे मोबाईल क्रमांक व आधार सिडींग १००% पूर्ण करण्याचा केंद्र शासनाच्या सूचना आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अधिक पारदर्शकता येण्यासाठी मोहिम राबवून लाभार्थ्याचे आधार व मोबाईल सिडींग सुधारणे आवश्यक आहे. याकरिता रास्त भाव दुकानांतील ई-पॉस उपकरणांमधील शघधउ व मोबाईल सिडींग सुविधेचा अधिकतम वापर करुन आधार व मोबाईल क्रमांक सिडींगचे प्रमाण वाढविण्यात यावे, अशा सूचना शासनाकडून प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने दिनांक ३१ जानेवारो २०२१ पूर्वी प्रत्येक रेशनकार्डमध्ये लाभार्थ्याचे १००%, आधार सिडींग आणि किमान एक वैध मोबाईल क्रमांक सिड करण्याचा उद्दिष्ट पूर्तीसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व एपीएल (केशरी) शेतकरी योजनेतील शिधापत्रिकेतील सर्व लाभार्थ्यांनी आपले आधार कार्ड आणि किमान एक वैध मोबाईल क्रमांक तात्काळ रास्त भाव धान्य दुकानदारांकडे जमा करावा. दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यत आधार सिडींग न झालेल्या लाभार्थ्याचे अनुज्ञेय धान्य पुढील महिन्यापासून आधार सिडींग होईपर्यत निलंबित करण्यात येईल. असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कळविले आहे.

# प्रशासनाच्या गलथान कारभाराच्या विरोधात माजी मंत्री विनायकराव पाटलांचे पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन

**अहमदपुर/फिरोज शेख**

सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून प्रशासनाने मनमानी कारभार सुरू केला असल्याने प्रशासनाच्या चुकीच्या कारभाराच्या विरोधात भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सदस्य तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी चक्क पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. अहमदपूर पोलिस स्टेशनने पंचायत समिती सदस्य राम बापुराव नरवटे रा.शेनकुड तालुका अहमदपुर यांना १४४,२ कलमान्वे नोटीस दि.१४ जानेवारी रोजी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास बजावली होती.सदरील नोटीसी ही सध्या ग्राम पंचायत ची निवडणूक असल्याने उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांनी काढली होती. आपण शेणकुड गावांमध्ये उपस्थित राहू नये अशी समज दिली होती. अशाच स्वरूपाची नोटीस राम नरवटे यांच्या विरोधी पॅनलच्या लहू नरवटे यांना ही दिली होती. अशा स्वरूपाच्या नोटीसा दुसऱ्या काही गावातील लोकांना दिल्या होत्या परंतु राजकीय दबावामुळे पोलिस



प्रशासनाने राम बापुराव नरवटे यांना ग्रामपंचायत निवडणुकीचे मतदान चालू असताना सायंकाळी चार वाजता गावातील घरी जाऊन हुज्जत घालून बिट जमादार केंद्रे व इतर पोलिसांनी मारहाण करून पोलिस गाडीत डांबून ठाण्यात आणलें, विरोधी पॅनलचे सदरील मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधी म्हणून काम करत असलेल्या लहू नरवटे याला ही तशाच पद्धतीनची नोटीस बजावली होती, परंतु जाणीवपूर्वक त्याला नघेता राम नरवटे यालाच आणल्याचे गावांमध्ये मोठा गोंधळ उडाला होता. प्रशासन हे दाबावाखाली काम करत असल्याने माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी चक्क पोलिस ठाण्यात ठिय्या मांडला. राम नरवटे यांना नोटीस द्यायचीच होती तर आठ दिवस अगोदर उपजिल्हाधिकारी यांनी का काढली नाही.

मतदानाच्या आदल्या दिवशी रात्री बारा वाजता का दिली व मतदानाला दिड तास उरला असताना तु तडीपार आहेस म्हणून पोलिसांनी दहशतीचे वातावरण गावात निर्माण करून ठाण्यात उचलून आणले. हे सर्व राजकीय दबावामुळे प्रशासनाने कृत्यं केले आहे. इतरही काही गावांतील लोकांना व त्याच शेनकुड गावातील लहू नरवटे याला पोलिसांनी का आणलं नाही. याचा जवाब विचारण्यासाठी माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी चक्क ठिय्या आंदोलन सुरू केले. काही वेळानी पोलिस उपअधीक्षक बलराज लंजीले ठाण्यात आल्यानंतर माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केल्यानंतर लंजीले म्हणाले की सदरील नोटीस ही हद्दपारीची नव्हती किंवा संबंधितांना अटक करण्याची नव्हती आमच्या पोलीसांनी असं करायला नको होते. संबधीताची चौकशी ...पान ६ वर

# बाभळगाव येथे आधुनिक यंत्राव्दारे ऊसरोप लागवड प्रात्यक्षिक कार्यक्रम



**लातूर/प्रतिनिधी**

कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवून, परवडणारी फायदयाची शेती करण्यासाठी शेतकरी बांधवानी आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करावा असे आवाहन, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी केले आहे. त्या लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील शेतावर महिद्रा अॅन्ड महिद्रा कंपनीच्या ऊसरोप लागवड यंत्र प्रातयक्षिक कार्यक्रमात बोलत होत्या. प्रारंभी महिद्रा अॅन्ड महिद्रा कंपनीच्या ऊसरोप लागवड यंत्राचे ऊसरोप लागवड प्रात्याक्षिक कार्यक्रम झाला. यंत्राव्दारे कोसी ८६०३२ ऊसरोपांची लागवड करण्यात आली. यावेळी कंपनीचे क्षेत्रीय अधिकारी स्वप्नील माईनकर यांनी इटालीयन तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्राव्दारे ऊसरोप लागवड कशी होते या संदर्भातील प्रात्यक्षिकासह माहिती दिली. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी क्षेत्रीय अधिकारी स्वप्नील माईनकर व शक्ती टॅक्टर्सचे प्रोप्रारायटर आदित्य बंडेवार यांच्या सोबत ऊसरोप लागवड यंत्राच्या माध्यमातून आधुनिक व किफायतशीर ऊसशेती, व्यवसायीक संधी व रोजागरनिर्मीती होण्यासाठीच्या संधी, तसेच ऊसरोप यंत्रासाठी येणारा खर्च, शासन अनुदान व कर्ज उपलब्धता आदी बाबत सविसत्र चर्चा केली.

यावेळी पूढे बोलतांना कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख म्हणाल्या, ऊसरोप यंत्राव्दारे ऊसरोप लागवड ...पान ६ वर





## पालघर जिल्ह्यात लसीकरणास सुरूवात

पालघर जिल्ह्यात कोव्हिड लसीकरणास जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ आणि जिल्हा परिषद मुख्य कार्याकारी अधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या उपस्थितीत सुरवात झाली. यावेळी जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. सागर पाटील यांना पहिली लस टोचून लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला यावेळी पालघरच्या नगराध्यक्षा डॉ. उज्वला काळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेत कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने लसीकरण मोहिमेस पालकमंत्री अमित देशमुख व राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत सुरुवात करण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर गिरीश ठाकूर यांना कोरोना प्रतिबंधात्मक लस देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., महापौर विक्रांत गोजमगुंडे, मेडिकल कॉलेजचे डीन डॉक्टर मोहन डोईबळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यातील पाटोळे परिवाराने केली पारंपारिक पद्धतीने वेळ अमावस्या साजरी





**लातूर/प्रतिनिधी**

काळ्या आईच्या सन्मानाचा उत्सव असलेला वेळ अमावस्येचा सण लातूर जिल्ह्यासह सर्वच तालूक्यात बुधवार ( दि.१२) रोजी पारंपारिक पध्दतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा सण शेतकरी वर्गासाठी अत्यंत महत्वाचा आहे. अगदी सकाळ पासूनच शेताकडे जाण्यासाठी शेतकऱ्यांची कुटुंबासह घाई असते. सकाळपासून शहरांतून ग्रामीण भागाकडे जाणारे सर्वच रस्ते गर्दीने फुलले होते. परिणामी शहरांत दिवसभर शुकशुकाट होता. शेतकऱ्यांनी शेतात एक कडब्याची कोप तयार करून त्याच ठिकाणी धान्याची आणि मांडलेल्या पांडवांची पूजा करून एका अर्थाने वनराईची भक्तीभावाने पूजा केली जाते.

या पुजेसाठी नैवाद्य ही खास असतो. त्यामध्ये शेंगदाण्याचे लाडू, बोरे, जांभ, हरभऱ्याची ओली भाजी, ताक, लसूण व भाकरीच्या पीठापासून तयार केलेले अंबील, विविध भाज्या एकत्र करून तयार केलेली भज्जी आणि ज्वारी, गहू, बाजरीचे (सजगुऱ्याचे) उंडे याचा समावेश असतो. गोड पदार्थ म्हणून तिळगुळाची पोळी आणि गव्हाची खीर असते. त्याच प्रमाणे काही ठिकाणी पांढरी ज्वारी सडुन तयार केलेला आंबटभात ही असतो. आंबील वाटीत घेऊन शेतकरी भाऊ-भाऊ, पिता-पुत्र, आजा-नातू आदी पुरूष पुजेभोवती प्रदक्षणा घालतात. यावेळी इडापिडा टळू दे, ...पान ६ वर

# जनवादी महिला संघटनेच्या वतीने तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा




**वाडा/प्रतिनिधी**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात कृषी कायदे केले ते रद्द व्हावेत म्हणुन देशातील केंद्र सरकारच्या विरोधात दिल्लीत संघर्ष करत असलेल्या शेतकऱ्यांना पाठींबा देण्यासाठी आणि महिलांचे स्थानिक प्रश्न घेऊन अखिल भारतीय जनवादी महिलासंघटनेच्या वतीने मंगळवारी (दि.१२) वाडा तहसिल कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. संघटनेच्या राष्ट्रीय सचिव कॉ. मरियम ढवळे, राज्य अध्यक्ष प्राची हातीवलेकर यांच्या मार्गदर्शनावाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वे करुन सरसकट खावटी वाटप करा. तालुक्यातील सरकारी दवाख्यान्यात महिलांना चांगली वागणुक मिळाली पाहीले, तालुक्यातील सर्व गावपाड्यात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहीजे, विधवा महिलांना तात्काळ निराधार पेंशन योजना चालू करा, तालुक्यात सार्वजनिक ठिकाणी शौचालये आणि पाणपोईची सुविधा द्या, तालुक्यातील सर्व मनरेगाची ...पान ६ वर

# जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेती करावी-जिल्हाधिकारी पृथ्वीराज

**नळेगाव/प्रतिनिधी**

जिल्हयात रेशीम शेती करण्यासाठी महा रेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपले नांव नोंदणी करुन रेशीम शेती करावी असे आवाहन जिल्हाधिकारी बी.पी.पृथ्वीराज यांनी केले. चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील अल्पभूधारक शेतकरी गोविंद रामा अलूरे या शेतकऱ्याच्या एक एकर तुती लागवड केलेल्या रेशीम शेती पाहणी प्रसंगी त्यांनी केले. या रेशीम शेती पाहणी वेळी उपसंचालक (आत्मा) पाटील, रेशीम विकास अधिकारी एन.बी. बावगे, परिसरातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी बी.पी. पृथ्वीराज म्हणाले की, जिल्हयात रेशीम शेती करण्यास वाव असून रेशीम कोषाला सोन्याचा भाव आहे. जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपले नांव नोंदणी करुन रेशीम शेती करण्याचे आवाहन केले. मागील वर्षी राबविण्यात आलेल्या महा रेशीम अभियान २०२० मध्ये लातूर जिल्हा हा महाराष्ट्रात क्रमांक तीन वर होता. या वर्षी आपला जिल्हा राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. असे त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी रेशीम अधिकारी श्री.बावगे म्हणाले की, मनरेगा अंतर्गत एक एकर तुती लागवडीचे अंदाज पत्रक ३ लाख



२३ हजार ७९० तीन वर्षात दिले जाते. यासाठी लाभार्थी हा अल्पभूधारक असावा व शासन निर्णयानुसार एका गावात कमीत कमी १० शेतकऱ्यांनी रेशीम शेती करणे गरजेचे आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजना (पोखरा) या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना एक एकर तुती लागवड,किटक संगोपन गृह बांधकाम व किटक संगोपन साहित्य या करिता साधारण लाभार्थ्यांना २ लाख २० हजार २२९ रुपये व अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थी करीता २ लाख ६४ हजार २७५ रुपये दिले जाते. या करीता बहू भूधारक लाभार्थी देखील लाभ घेऊ शकतात. इतर व्यावसायीक पिकापेक्षा रेशीम शेतीमध्ये एक महिन्यात शेतकऱ्यास जास्त उत्पन्न मिळते. तसेच तुतीचा पाला शेतकरी जनावरांना पशु खाद्य म्हणून देऊ शकतात असे ही श्री. बावगे यांनी स्पष्ट केले.

# जिजाऊंच्या संस्कारांमुळे छत्रपती शिवराय स्वराज्य रक्षक बनले -प्राचार्य डी.एन.केंद्रे

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रमाता मॉ जिजाऊ यांची प्रेरणा व संस्कारातून स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे आजच्या मातांनी आपल्या पाल्यांवर जिजाऊंप्रमाणे संस्कार करावेत आणि युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे अनुकरण करून उज्ज्वल भारत निर्माण करावा, असे आवाहन मराठवाडा पालक संघाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात राष्ट्रमाता मॉ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, त्या प्रसंगी प्राचार्य केंद्रे बोलत होते. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, आर. डी. बिरादार, पी. व्ही. कुलकर्णी, एस. एस. देशपांडे, एस. एन. वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, महापुरुषांना डोक्यावर घेवू नका तर त्यांचे विचार डोक्यात घ्या. पुतळे किंवा




प्रतिमांचे पूजन करून महापुरुषांच्या जयंती साजऱ्या करण्यापेक्षा त्यांचे जीवन-कार्य आणि त्यांच्या विचारांचे अनुकरण करून ते प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे. यातूनच आपण एक सुसंस्कृत व शिक्षणप्रिय नवीन भारत निर्माण करू शकतो, एक नवा इतिहास घडवू शकतो. आपण ज्ञानार्जनाचे कार्य करीत असल्याने आपल्याकडून समाजाच्या खूप अपेक्षा आहेत. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून आपण समर्पित भावनेने कार्य करण्याची गरज आहे. शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचण्याची आवश्यकता आहे. आज शिक्षणातील मुलींची गळती ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. सरकारने मुलींसाठी बारावीपर्यंत मोफत शिक्षणाची सोय केली आहे. मुलींसाठी मोफत वसतीगृहे व आश्रमशाळाही सुरु करण्यात आल्या आहेत. मात्र, आर्थिक दुर्बल घटकांतील पालक मुलींच्या शिक्षणाबाबत उदासिन आहेत. महाराष्ट्रात मुलांच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. प्राथमिक विभागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण ४७ टक्के, माध्यमिक ४०, महाविद्यालयीन ३३ तर इतर उच्च शिक्षणात ...पान ६ वर